POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

# मराठी दैनिक मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३५६ ● मुंबई, रविवार, २७ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## पुणे - हिंजवडीत अजित पवारांनी दिली सर्वात मोठी कबुली
## रोहित पवार म्हणाले 'ही भाजपाकडून...'



**■पुणे। प्रतिनिधी,**

हिंजवडी पाहणी दौ-यात पालकमंत्री अजित पवार आक्रमक झाल्याचं पाहायला मिळाले. यावेळी अजित पवारांनी आयटी पार्क बंगळुरु, हैदराबादला जात असल्याची कबुली दिली. दादांनी दिलेल्या कबुलीनंतर विरोधकांनी थेट भाजपवर निशाणा साधलाय.

महाराष्ट्रातील उद्योगावरून अजित पवारांनी एक मोठं विधान केलंय. हिंजवडी पाहणी दौ-यात पालकमंत्री अजित पवार चांगलेच आक्रमक झाले होते. दरम्यान यावेळी अजित पवारांनी महाराष्ट्रातील उद्योग राज्याबाहेर जात असल्याची थेट कबुलीच दिली. महाराष्ट्रातील उद्योग - धंद्यावरून मविआ आणि महायुतीमध्ये आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी रंगल्या होत्या.

महाराष्ट्रातील उद्योग राज्याबाहेर जात असल्याचा आरोपही करण्यात आला होता.. दरम्यान विरोधकांचे सर्व आरोप सत्ताधा-यांनी फेटाळले होते. मात्र, आता थेट अर्थमंत्र्यांनीच उद्योग महाराष्ट्राबाहेर जात असल्याची कबुली दिल्यानं चांगलीच चर्चा रंगली आहे.


अजित पवारांनी दिलेल्या कबुलीनंतर विरोधकांना सरकारवर टीका करण्याची आयती संधीच मिळाली.. अजित पवार सत्य बोलले आहेत. राज्यातून उद्योग बाहेर चालले हे माहिती असूनही सरकारनं कोणताही निर्णय घेतला नसल्याची टीका राष्ट्रवादी एसपीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदेंनी केली आहे.

अजित पवार सत्य बोलले, हिंजवडीमधील उद्योग बाहेर जातायत असं शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी म्हटलं आहे. रोहित पवारांनी देखील आयटी पार्कच्या मुद्द्यावरून भाजपवर निशाणा साधला आहे. भाजपला अजित पवारांची कोंडी करायची आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

तसंच पुण्यातील आयटी पार्क देशात नंबर एक होतं ते आता सहाव्या नंबरवर आल्याची खंत देखील त्यांनी व्यक्त केली आ-हे. भाजपला अजित पवारांची कोंडी करायची आहे का? अशी विचारणाही रोहित पवारांनी केली आहे.

महाराष्ट्रातील उद्योगावरून म-वआ आणि महायुतीमध्ये चांगलंच रान पेटलं होतं. तेव्हा विरोधकांनी केलेल्या आरोप फेटाळत सत्ताधा-यांनी विरोधकांनाच कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, आता अजितदादांनीच उद्योग महाराष्ट्राबाहेर जात असल्याची कबुली दिली आहे. त्यामुळे दादांच्या या वक्तव्यानंतर महायुती चांगलीच अडचणीत येण्याची शक्यता आहे.

## अजित दादांना मंगळवारी भेटण्यापूर्वी माणिकराव कोकाटेंच मोठं विधान



### मुख्यमंत्री फडणवीसही नाराज

काही मंत्र्यांचे वादग्रस्त व्हिडीओ समोर आले असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तीव्र नाराजी व्यक्त केली असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली, दोन्ही नेत्यांमध्ये 25 मिनिटं चर्चा झाली होती, ही चर्चा वादग्रस्त मंत्र्यांच्या राजीनाम्या संदर्भात होती, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. त्यामुळे आता फडणवीस या मंत्र्यांचा राजीनामा घेणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा सभागृहात रमी खेळतानाचा एक व्हिडिओ समोर आला होता. त्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. कोकाटे यांच्या राजीनाम्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार हे येत्या मंगळवारपर्यंत निर्णय घेणार आहेत. छावा संघटनेचे विजय घाडगे यांना तसा शब्द आज अजित पवार यांनी दिला आहे. त्यानंतर आता माणिकराव कोकाटे यांनी केलेलं एका विधानामुळे राजकीय वतुर्ळात चर्चा रंगली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**अजित पवारांनी राज्याचं नेतृत्व करावं - कोकाटे**

माणिकराव कोकाटे यांनी एका सभेत बोलताना म्हटले की, ह्यअजित पवार आम्हाला न्याय देऊ शकतात असं जनतेला वाटत आहे. आता राष्ट्रवादीत प्रवेश करण्यासाठी अनेकांनी गर्दी केली आहे. त्यामुळे अजित पवार यांनी राज्याचं नेतृत्व करावं अशी तुमची माझी इच्छा आहे.ह्व याचाच अर्थ कोकाटे यांनी अजित पवारांनी मुख्यमंत्री व्हावं अशी इच्छा व्यक्त केली आहे.

**कोकाटेंच्या व्हिडिओमुळे राजकारण पेटलं**

माणिकराव कोकाटे यांचा व्हिडिओ समोर आल्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे लातूर दौऱ्यावर असताना छावा संघटनेनं राजीनाम्यासाठी त्यांना निवेदन दिलं. याचवेळी काही कार्यकर्त्यांकडून सुनील तटकरे जिथे बसले होते, तिथे त्यांच्या टेबलवर पत्ते उधळण्यात आले. यानंतर तटकरे यांच्यासमोरच राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आणि छावाचे कार्यकर्ते आपसात भिडले होते. यावेळी विजय घाडगे यांना मारहाण करण्यात आली होती. त्यामुळे राजकारण आणखी पेटलं होतं.

## 'भाजपाच्या ट्रॅपमध्ये मनसे अडकली'
## रोहित पवारांचा सर्वात मोठा दावा

**■पुणे। प्रतिनिधी,**

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे मराठीच्या मुद्द्यावर पुन्हा एकत्र आलेत. २० वर्षांनंतर दोन भावांना एकाच मंचावर ठाकरे कुटुंबाचे हे मनोमिलन राज्याने पाहिलं. त्यानंतर अजित पवार आणि शरद पवार एकत्र येणार का? अशी चर्चा सुरु झाली. त्यावर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार यांनी मोठं विधान केलं आहे.

रोहित पवार म्हणाले की, अजित पवार आणि शरद पवार हे राजकीयदृष्टीकोनातून एकत्र येणार नाहीत. हे पवारसाहेबांनीही स्पष्टपणे सांगितलं आहे. आम्ही देखील आमच्या कार्यकर्त्यांना सांगितलं आहे की, आपल्याला लढायचं आहे, संघर्ष करायचा आहे.

**'मनसेच्या या कृत्याचा भाजपला फायदा!'**

पुढे रोहित पवार म्हणाले की, ठाकरे कुटुंब जेव्हा मंचावर एकत्र येत होते तेव्हा वैक्तिगतरित्या त्याच स्वागत केलं. तुम्ही जर बघितलं दोन जण एकत्र येणं मला तरी असं वाटतं मनसेने आपलं महत्त्व वाढून घेतलं. त्यात तुम्ही बघितलं तर जीआर



त्यांना मागे घ्यावा लागला. त्याचं संपूर्ण श्रेय सर्वसामान्य लोकांना, मराठी लोकांना जातं. या दोन बंधू राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंना जातं. या दोन पक्षांचे हे १०० टक्के श्रेय आ-हे. पण भाजपला हेच पाहिजे होतं. भाजपने या परिस्थितीचा वापर करुन मुंबईमध्ये मरा-ठी विरुद्ध हिंदी किंवा मराठी भाषिक विरुद्ध परप्रांतीय असा एक वाद त्यांनी सुरु केला. त्यात झालं असं की केडिया नावाचे उद्योगपती आहेत, जे भाजपच्या विचाराचे आहेत. त्यांनी तो वाद सुरु केला. मग कोणी फोडलं त्यांचं ऑफिस मनसेच्या कार्यकर्त्यांनी फोडलं. मग नंतर कुठे कुठे फोडा फोडी झाली ती मनसेच्याच कार्यकर्त्यांनी केली. यातून भाजपला जे पाहिजे होतं, ते दुदैवाने विचार न केल्यामुळे किंवा वरुन आदेश न आल्यामुळे मनसेच्या कार्यकर्त्यांनी फोड-फोडी सुरु केली.

## महाराष्ट्रात हजारो 'लाडके पुरुष'! 'लाडक्या बहिणीं'च्या योजनेवर डल्ला, १४ हजारांहून अधिक...



**■जळगाव । प्रतिनिधी,**

लाडकी बहीण योजना अल्प काळातच गाजली. या योजनेचा अनेक महिलांनी फायदा घेतला. पण तेवढेच या संदर्भात गैरप्रकारही समोर आले आहेत. योजनेच्या लाभार्थींची छाननीत एक मोठा प्रकार उघडकीस आला आहे. 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत महिलांना दरमहा मिळणाऱ्या मानधनात १४,२९८ पुरुषांनीही गुपचूप लाभ घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आ-हे. यामुळे तब्बल २१.४४ कोटी रुपयांचा निधी चुकीच्या हातात गेला आहे. आता हे पैसे परत मिळणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**१० महिन्यांपर्यंत घेतला लाभ**

ऑगस्ट २०२४ पासून लागू झालेल्या या योजनेत लाभार्थ्यांच्या यादीत पुरुष कसे सहभागी झाले, हे शोधण्यासाठी सरकारी यंत्रणा कागदपत्रांची छाननी करत आहेत. पुरुष असूनही कसा काय लाभ मिळाला, यामागे डेटा तपासणीतील निष्काळजीपणा, तसेच काही अधिकाऱ्यांची मिलीभगत असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**राज्य सरकारची गोची**

राज्य सरकार या योजनेसाठी दरवर्षी सुमारे ४२,००० कोटी रुपयांचा खर्च करत आहे. शिंदे सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही योजना आणली होती आणि त्याचा राजकीय फायदा देखील मिळवला. मात्र अशा प्रकारच्या घोळांमुळे योजनेच्या पारदर्शकतेवर मोठा प्रश्न उभा राहिला आहे. सरकार आता हे पैसे परत घेणार का? दोषींवर कारवाई होणार का? आणि या योजनेचा फायदा खरंच गरजू महिलांपर्यंत पोहोचतोय का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

**शेकडो नाही, हजारो 'पुरुष लाडके'**

या योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र महिलेला दरमहा १५०० रुपये मानधन दिलं जातं. पण हीच रक्कम १४,२९८ पुरुषांच्या खात्यांमध्येही जमा होत होती. हे उघड होताच त्यांचा लाभ तातडीने थांबवण्यात आला आहे. आता या अपात्र व्यक्तींनी घेतलेली रक्कम सरकार परत मागणार का, यावर कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट झालेली नाही.

**संशयास्पद २.३६ लाख लाभार्थी**

या घोटाळ्यात आणखी एक मोठा पैलू पुढे आला आहे. तब्बल २ लाख ३६ हजार ०१४ लाभार्थ्यांबाबत शंका आहे. त्यांनी महिलांची नावं वापरून फसवणूक केली असावी असा संशय आहे. यासंबंधी तपास सुरू आहे आणि ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**६५ वर्षांवरील महिलांनेही घेतला गैरलाभ**

'लाडकी बहीण' ही योजना ६५ वर्षांखालील महिलांसाठी आहे, कारण वयोवृद्धांसाठी वेगळ्या योजना अस्तित्वात आहेत. तरीही २ लाख 87 हजार 803 ज्येष्ठ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. यामधून त्यांच्या खात्यांमध्ये सुमारे 431 कोटी रुपये जमा झाले आहेत. पुढील काळात या लाभार्थ्यांना यादीतून वगळलं जाणार असून यामुळे दरवर्षी ५१८ कोटी रुपयांची बचत होणार आहे.

**एकाच कुटुंबातील अनेक महिलांना लाभ?**

नियमांनुसार, एका कुटुंबातील फक्त दोन महिलांनाच योजनेचा लाभ मिळू शकतो. पण तपासणीत आढळलं की 7 लाख 97 हजार 751 कुटुंबांमध्ये दोनपेक्षा अधिक महिलांनी लाभ घेतला. यामुळे सुमारे 1,196 कोटी रुपयांची रक्कम सरकारने वितरित केली आहे. या महिलांना यादीतून वगळायचं की नाही, यावर निर्णय अद्याप बाकी आहे.

## वाल्मिक कराड जेलमधू कुणाशी फोनवर बोलत असतो?

**■मुंबई । प्रतिनिधी,**




सरपंच संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणात वाल्मिक कराड सध्या जेलमध्ये आहे. मात्र कराड जेलमधून सर्व काही करतोय असा गौप्यस्फोट शिवसेना वइळचे नेते अंबादास दानवे यांनी केलाय. इतकंच नाही तर आपल्या समोर बसलेल्या एका व्यक्तीला कराडचा जेलमधून फोन आला होता असा दावाही दानवे यांनी केलाय. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड तुरुंगाची हवा खातोय. मात्र वाल्मिक तुरुंगात असला तरी बीडमध्ये वाल्मिकची गँग सक्रीय असल्याचं बोललं जात होतं. आता शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी याप्रकरणात एक मोठा दावा केला आहे. वाल्मिक कराड जेलमध्ये मोबाईल फोन वापरतो, असा खळबळजनक दावा दानवेंनी केलाय...इतकंच नाही तर माज्यासमोर बसलेल्या व्यक्तीला जेलमधून वाल्मिकचा फोन आला होता असंही दानवेंनी सांगितलंय.वाल्मिक कराड तुरुंगातून फोनवर बोलतो की नाही याची सखोल चौकशी अन्यथा रस्त्यावर उतरू असा इशारा मनोज जरांगेंनी दिलाय. संतोष देशमुखांचे बंधू धनंजय देशमुखांनीही यावर भाष्य केलंय...फोन कॉल डिटेल्ससह संपूर्ण तपासणी होणं गरजेचं आहे, अशी मागणी धनंजय देशमुखांनी केली आहे. अंबादास दानवेंच्या या दाव्यामुळे वाल्मिक कराडला जेलमध्ये फोन कुणी दिला, असा प्रश्न उपस्थित होतोय. इतकंच नाही तर अजूनही वाल्मिक कराडसारख्या गुंडाला तुरुंगात व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात आहे का, असे अनेक प्रश्न यानिमित्तानं उपस्थित झालेत.

वाल्मिक कराड जेलमधून फोनवर बोलतो की नाही याची सखोल चौकशी करा अन्यथा रस्त्यावर उतरू असा इशारा मनोज जरांगे यांनी दिलाय. कराड हा दहशतवाद्यांपेक्षा घातक असल्याचं जरांगेंनी म्हटलंय.. ५० दिवसात महाराष्ट्राची मोठी बदनामी झाली आहे. सरकारला याचं उत्तर द्यावं लागेल, असं वक्तव्य खासदार सुप्रिया सुळे यांनी केले आहे.य वाल्किम कराड फोनवर बोलत आहे, त्याला व्हीआयपी ट्रिटमेंट सुरु आहे. याबाबत अमित शाहांची भेट घेणार असल्याचंही सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

## 'माझा नवरा तर बेडवरुन पडला...' पण त्याआधी पतीने पत्नीच नको ते रुप पाहिलं

**■मुंबई । प्रतिनिधी,**

दोघांचा रोमान्स चाललेला. आपल्याला कोणी बघतय याचं त्यांना भानच उरल नव्हतं. त्यावेळी अचानक दरवाजा उघडला. समोर उभा असलेला माणूस जोरात ओरडला आणि विचारलं, हे काय चाललं आहे?. रोमान्समध्ये बुडालेले दीर-वहिनी ताळ्यावर आले. समोर महिलेचा पती होता. घाबरलेली महिला पतीला म्हणाली, माझं दीरासोबत का-ही नाहीय. दीरही म्हणाला दादा असं काही नाहीय. पण नवऱ्याने सर्व डोळ्यांनी पाहिलं होतं. जेव्हा पत्नीला वाटलं की, आता का-ही होऊ शकत नाही. त्यावेळी तिने दीराच्या साथीने मिळून नवऱ्याला मारुन टाकलं. जेणेकरुन सत्य काय हे कधीच कोणाला कळू नये.

मग हत्येला दुर्घटना दाखवून दीर-वहिनी पोलिसांची दिशाभूल करु लागले. महिला म्हणाली, साहेब! माझा नवरा बेडवरुन खाली



पडला. त्यामुळे त्याचा मृत्यू झाला. पण पोस्टमार्टम रिपोर्टमधून सत्य काय ते समोर आलं. समजलं की हत्या गळा घोटल्यामुळेच झालीय. त्यानंतर दोन्ही आरोपींनी आपला गुन्हा कबूल केला. सध्या दोघे तुरुंगात आहेत. मध्य प्रदेशच्या सागर जिल्ह्यातील ही घटना आहे.

**एकत्र एकाखोलीत पाहिलेलं**

बरायठा पोलीस ठाणे क्षेत्रात येणाऱ्या गावातील एका २५ वर्षीय युवकाची गळा आवळून हत्या करण्यात आली. पोलिसांनी सांगितलं की, ''मृतकाच्या पत्नीचे दीरासोबत अनैतिक संबंध होते. पतीने एकारात्री दोघांना एकाखोलीत पाहिलेलं. त्यानंतर पत्नी आणि भावाने मिळून पतीची हत्या केली.''

पोलिसांनी संशयाच्या आधारावर मृतकाची पत्नी आणि छोट्या भावाची चौकशी केल्यानंतर ते कोसळले. आपला गुन्हा त्यांनी कबूल केला. दोघांमध्ये अनैतिक संबंध होते. घटनेच्या रात्री वीरेन्द्रने दोघांना एकत्र एका खोलीत पाहिलेलं.

**त्यावेळी सर्व घटनाक्रमाचा खुलासा**

बरायठा पोलिसांना वीरेन्द्र कुमार नावाच्या व्यक्तीच्या मृत्यूची माहिती मिळाली. पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी वीरेन्द्रचा मृतदेह घराच्या खोलीतच पडलेला होता. पत्नी आणि छोट्या भावाने पोलिसांना सांगितलं की, वीरेन्द्र खाटेवरुन खाली पडला आणि त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी मृतदेहाच पोस्टमार्टम केलं, त्यावेळी मृत्यू गळा आवळल्यामुळे झाल्याच सत्य समोर आलं. या आधारावर पोलिसांनी तपास सुरु केला. त्यावेळी सर्व घटनाक्रमाचा खुलासा झाला.

## नायगावमध्ये १२ व्या मजल्यावरुन पडून चिमुकलीचा दुर्दैवी अंत



मिळालेल्या माहितीनुसार, प्रजापती कुटुंब नायगाव पूर्वेकडील ह्यनवकार फेज वनह्व या इमारतीत, बी-२ विंगमध्ये राहत होते. मंगळवारी रात्री अन्विका याच सोसायटीतील बी-३ विंगमध्ये असलेल्या आपल्या बहिणीच्या घरी गेली होती. यावेळी ही दुर्घटना घडली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज आता समोर आले आहे.

**■वसई। प्रतिनिधी,**

वसई पूर्वेकडील नायगाव या ठिकाणी असणाऱ्या इमारतीच्या १२ व्या मजल्यावरून खाली पडून एका ४ वर्षीय चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. मंगळवारी २२ जुलै रोजी रात्री ८ ते ८:३० च्या सुमारास ही घटना घडली. अन्विका प्रजापती (४) असे मृत्यू झालेल्या चिमुकलीचे नाव आहे. या घटनेने नायगाव परिसर हादरला आहे. यामुळे लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.

मंगळवारी रात्री अन्विका तिच्या आईसोबत सोसायटीतील बी-३ विंगमध्ये असलेल्या आपल्या बहिणीच्या घरी गेली होती. ते घरी जाण्यासाठी निघाले असताना अन्विका ही घराबाहेर खेळत होती. यामुळे तिच्या आईने तिला चप्पल ठेवण्याच्या लाकडी स्टँडवर बसवले होते. यानंतर खेळता खेळता अन्विका स्टँडवर चढून खिडकीजवळ गेली. दुदैवाने, तिचा अचानक तोल गेला आणि काही समजण्याच्या आतच ती १२ व्या मजल्यावरून खाली पडली. ही संपूर्ण दुर्दैवी घटना इमारतीत लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

घटनेनंतर तात्काळ इमारतीत राहणाऱ्या नागरिकांनी अन्विकाला उपचारासाठी वसईतील महापालिकेच्या सर डी. एम. पेटिट रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तिला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या घटनेमुळे नायगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. तसेच यामुळे प्रजापती कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**पोलिसांकडून अधिक तपास सुरु**

या प्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली असून, पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत. या घटनेमुळे पालकांनी आपल्या मुलांना डोळ्यात तेल घालून जपावे, असे सांगितले जात आहे.

दरम्यान नवकार इमारतीमधील रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, या १४ मजली इमारतींमधील बहुतांश इमारतींच्या खिडक्यांना आणि गॅलरीला कोणत्याही प्रकारच्या सुरक्षा जाळ्या नाहीत. तसेच अन्य ठिकाणीही सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. जर सुरक्षा जाळ्या असत्या तर ही चिमुकली खाली पडली नसती, अशी प्रतिक्रिया इमारतीत राहणाऱ्या नागरिकांनी दिली आहे. सुरक्षा उपायांच्या अभावामुळे एका चिमुकल्या जीवाचा बळी गेल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

## महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम राहील...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईसह चंद्रपूर, गडचिरोली भंडारा आणि गोंदिया येथे पावसाचा जोर कायम आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्कतेचा इशा-रा देण्यात आला आहे. भारतीय हवामान खात्याने आणि राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, २६ जुलै २०२५ रोजी पालघर, पुणे घाट परिसर, चंद्रपूर आणि गोंदिया या जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आलाय. या भागांमध्ये अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. २४ तासांत २०४ मिमी पेक्षा जास्त पावसाची शक्यता वर्तवण्यात आलीय. यामुळे पूर, भूस्खलन आणि पाणी साचण्याचा धोका वाढू शकतो. नागरिकांना सतर्क राहण्याचा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया. ठाणे, मुंबई आणि संपूर्ण कोकण विभाग, जळगाव, नाशिक घाट, सातारा घाट, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, अमरावती, भंडारा, गडचिरोली, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. २४ तासांत ११५ ते २०४ मिमी वादळी वारे ४०-५० किमी प्रतितास वेगाने वाहण्याची शक्यता आहे. तसेच विजांचा कडकडाट येण्याचीही शक्यता आहे.

## पुणे विमानतळावर १०.५ कोटी रुपयांचं ड्रग्ज जप्त, एअर कस्टम्स अधिकाऱ्यांनी मोठी कारवाई

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर एअर कस्टम्स अधिकाऱ्यांनी मोठी कारवाई केली आहे. १०.४७ किलो 'हायड्रोपोनिक वीड' (मारिजुआना) जप्त केलं आ-हे. याचं अंदाजे बाजारमूल्य १०.५ कोटी रुपये आहे. ही कारवाई २४ जुलै २०२५ रोजी करण्यात आली आहे. या प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे. इंडिगो फ्लाइट क्रमांक ६ए-१०९६ द्वारा बँकॉकहून पुण्यात दाखल झालेल्या अभिनय अमरनाथ यादव या भारतीय नागरिकावर अधिकाऱ्यांना संशय आल्याने त्याची कसून झडती घेण्यात आली. तपासादरम्यान, त्याच्या ताब्यातील सामानात अंमली पदार्थ सापडले. सदर ड्रग्स हायड्रोपोनिक पद्धतीने तयार करण्यात आलेले उच्च प्रतीचे गांजा असल्याचं स्पष्ट झालं आहे. अशा प्रकारचे ड्रग्स बहुधा महागड्या क्लायंटसाठी स्मगल केले जातात, त्यामुळे ही तस्करी आंतरराष्ट्रीय टोळीशी संबंधित असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.




एनडीपीएस कायदा, १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले आहे. न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सध्या आरोपीचा पार्श्वभूमी तपासला जात असून कोणकोणत्या देशांशी आणि टोळ्यांशी त्याचा संपर्क आहे. याचा तपास सुरु आहे. या प्रकरणात आणखी अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पुणे कस्टम विभागाच्या सतर्कतेमुळे मोठा ड्रग्स साठा पकडण्यात यश मिळालं असून ही एक मोठी टस्करी टळली आहे.

**१० दिवसापूर्वीच पुण्यात एका डॉक्टरवर झाली होती कारवाई**

मागील १० दिवसापूर्वीच पुण्यात एका निलंबित एमबीबीएस डॉक्टरसह तिघांना पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने बेड्या ठोकल्या होत्या. तो एका नामांकित रुग्णालयात प्रॅक्टिस करत असतानाच त्याला यापुवीर्ही ड्रग्ज प्रकरणातच पकडले होते. त्यानंतर त्याला निलंबित केले होते. त्यानंतर आता त्याला दुसऱ्या वेळेस पकडण्यात आले आहे. तिघांकडून तब्बल ११ लाख ४३ हजार रुपयांचे मेफेड्रोन जप्त केले आहे. दरम्यान, यातील एक आरोपी हा मुळचा जम्मूचा असून त्याचे एमबीबीएसचे शिक्षण झालेले आहे. त्याने डॉक्टर म्हणून काही रुग्णालयात काम देखील केले होते. पुण्यातील मध्यभागात असलेल्या एका नामांकित रुग्णालयात तो प्रॅक्टिस देखील करत होता. परंतु, त्याला काही महिन्यांपूर्वी पोलिसांनी ड्रग्ज प्रकरणात पकडले होते. नंतर त्याला निलंबित करण्यात आले होते. पुण्यातील बिबवेवाडी भागात ड्रग्जची तस्करी करणारे काही तरुण आले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर त्याला ताब्यात घेतलं होतं. पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता तिघांकडून एकूण १५ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# कोकाटेंच्या वाटेवर काटेच काटे!

विधान परिषदेच्या सभागृहात कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी मोबाईलवर रमी खेळल्याचा प्रकार समोर आला आणि त्यावरून सध्या राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकाराने सभागृहाची शिस्त डागाळलीच, शिवाय मंत्रिपदाच्या जबाबदारीचे गांभीर्यही उघडपणे अधोगतीकडे झुकते आहे, हे प्रकर्षाने जाणवले. शासन चालवणाऱ्यांनी गंभीरपणे आपल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, ही प्राथमिक अपेक्षा. पण शेतकऱ्यांच्या हितासाठी आवाज उठवायची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्याच कृषीमंत्र्यांनी अशा बेभान वर्तनाने सभागृहातील संपूर्ण प्रक्रियेचं अवमूल्यन केले आहे. कोकाटे यांनी आपण फक्त यू ट्यूबवर सभागृहाचे कामकाज पाहत होतो, असा बचाव केला खरा, पण कॅमेऱ्यात स्पष्टपणे खेळाचे दृश्य कैद झाले. अशा वेळी जबाबदारी स्वीकारण्याऐवजी प्रत्यारोपांच्या पायवाटेने जाणे ही दुर्दैवाची बाब आहे. मोबाईलवरील रमी हा काही गंभीर गुन्हा नसला, तरी तो सभागृहाच्या मर्यादा ओलांडणारा प्रकार आहे. तेथे चालणाऱ्या चर्चांमध्ये भाग घेण्याऐवजी मंत्री जर गेम खेळत बसले, तर निष्काळजीपणाचे लक्षण मानावे लागेल. शिवाय ते लोकशाही प्रक्रियेविषयी असलेल्या उदासीनतेचे लक्षण आहे. विशेष म्हणजे या घटनेनंतर त्यांनी 'एक रुपया घेणारे सरकार भिकारी असते', असे वक्तव्य केल्याने त्यांनी आपल्या चुकीवर पांघरूण टाकण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. कोकाटेंनी आपल्या कृतीबद्दल स्पष्ट माफी मागून जबाबदारी स्वीकारली असती, तर कदाचित जनतेच्या मनात विश्वास निर्माण झाला असता. पण उलटपक्षी त्यांनी विरोधकांवर टीका करत स्वतःची बाजू अधिक कमकुवत केली. अशा प्रकारचे वर्तन लोकशाहीचा उपहास करणे ठरते. शिंदे गट आणि अजित पवार यांच्या गटातील काही मंत्री वारंवार वादाच्या भोवऱ्यात सापडत आहेत, ही बाब लक्षवेधी आहे. आता हे प्रकार भाजपकडून जाणीवपूर्वक उघड केले जात आहेत की, योगायोगाने यात भाजपचे मंत्री नसतात, हा संशोधनाचा विषय होईल. हे वाद केवळ विरोधकांनी उभे केलेले असतील, असे गृहीत धरले तरी वेळोवेळी घडणाऱ्या अशा घटनांमुळे मंत्रिमंडळाच्या एकूण प्रतिमेवर डाग लागत आहेत. या नेत्यांना सत्तेच्या संधीपेक्षा जबाबदाऱ्या अधिक मोठ्या असतात, हे विसरले जात आहे. विधानसभा किंवा विधान परिषदेच्या कार्यवाहीत पूर्वीही काही अपप्रवृत्ती घडल्या आहेत. सदस्यांनी मोबाईलवर चॅट केल्याचे, अगदी झोप घेतल्याचेही प्रसंग आहेत. मात्र, मंत्रिमंडळातील वरिष्ठ सदस्यांनी प्रत्यक्ष खेळ खेळणे ही गोष्ट अभूतपूर्व ठरते. याच अधिवेशनात तंबाखू मळणारा आमदारही कॅमेऱ्यात बंदिस्त झाला. पण त्यावर वाद झाला नाही, हे विशेष. यापूर्वी २०१२ मध्ये काही आमदार पॉर्न पाहताना सापडले होते, त्यावरूनही मोठा गदारोळ झाला होता. तरीही सत्ताधाऱ्यांनी काही बंधनं पाळावीत, ही साधी अपेक्षा कायम अपूर्ण राहते. कृषी हा अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा विषय आहे. राज्यातील दुष्काळ, कर्जमाफी, शेतमालाचे दर, पावसाचे अनिश्चित चित्र या पार्श्वभूमीवर कृषी खात्याच्या प्रमुखाने जरा अधिक गांभीर्याने कामकाज पाहणे आवश्यक आहे. सभागृह हे केवळ भाषणाचं व्यासपीठ नसून ती एक पवित्र जागा आहे. तेथे बसणारे प्रत्येक सदस्य जनतेच्या प्रतिनिधित्वाची निशाणी असतात. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक हालचालीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष असते. त्यामुळं कोकाटेंनी केलेली चूक ही वैयक्तिक न राहता एक सार्वजनिक अपयश ठरते. कोकाटेंनी पहिल्यांदाच वादाला हात घातला असेही नाही. त्यांनी वेळोवेळी आक्षेपार्ह विधाने करत जनतेच्या जखमेवर मीठ चोळले आहे. एका कार्यक्रमात शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्यांशी करणाऱ्या कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी त्यानंतर पुन्हा एकदा शेतकऱ्यांबद्दल वादग्रस्त विधान केले होते. शेतकरी कर्ज घेतात आणि पाच-दहा वर्षे कर्जमाफीची प्रतीक्षा करतात, नियमित कर्जफेड करणाऱ्यांनी काय करावयाचे, तुम्ही कर्जमाफीच्या पैशांचे काय करता, साखरपुडे, विवाह करीत फिरता, असे धक्कादायक विधान यावेळी कोकाटे यांनी केले होते. काही दिवसांपूर्वीच शासकीय सदनिकेच्या गैरवापरप्रकरणी त्यांना शिक्षा सुनावली गेली होती. त्या प्रकरणातून राजीनामा देण्याऐवजी ते जणू काही स्वतःला मुक्तच समजत राहिले. ही धारणा गर्वाने भरलेली आहेच; शिवाय सत्तेच्या अतिरेकातून आलेली आहे, हे स्पष्ट दिसते. या सर्व घटनांमुळे कोकाटे स्वतःच्याच वर्तनाच्या चक्रव्यूहात अडकले आहेत. यापूर्वी दोन-तीन वेळा ते बचावले, पक्षाने त्यांना पाठीशी घातले, विरोधकांनी आवाज उठवला तरी ते टिकून राहिले. पण प्रत्येक वाद एक नवा डाग घेऊन आला आणि आता तो एवढा गडद झाला आहे की, त्यातून स्वच्छ चेहरा दाखवणे जवळजवळ अशक्य आहे. त्यांच्या भाषेत बोलायचे झाले, तर 'ओसाड गावची पाटीलकी' म्हणजेच कृषीमंत्रिपद त्यांच्याकडून काढून घेण्याची वेळ आली आहे. ही कारवाई झाली, तर ती केवळ राजकीय शिक्षाच नव्हे, तर व्यवस्थेने आपल्या शिस्तीचा दाखला दिल्याचे उदाहरण ठरेल. आज कोकाटे जे संकट झेलत आहेत, ते केवळ विरोधकांनी निर्माण केलेले नाही. त्यांच्या स्वतःच्या वागणुकीचा आणि सत्तेच्या गैरसमजुतीचा तो परिपाक आहे. दैवाने त्यांना मंत्रीपद दिले, पण त्याच्या वजनाची जाणीव न ठेवता त्यांनी केवळ गोंधळ, वाद आणि हिणकस विधानांनी आपलं स्थान कमकुवत केले. यापुढे त्यांच्या भवितव्यावर कोणतीही कारवाई झाली, तर 'दैवाने दिले, पण कर्माने नेले' एवढाच निष्कर्ष निघेल.

देशाचे राजकारण, समाजकारण, धर्म आणि संस्कृती, पौराणिक आणि अध्यात्मिक वारसा, सामाजिक सुधारणा, विज्ञान आणि संशोधन, कला आणि क्रीडा यासह अन्य क्षेत्रांत महाराष्ट्राचे योगदान लिहायचे झाले तर एक स्वतंत्र ग्रंथ तयार होतो. या क्षेत्रांमध्ये ज्यांचे अतुलनीय योगदान आहे त्यांचा उल्लेख करायचा झाला तरी शब्दसंख्या फार मोठी होईल. जे-जे उज्वल आणि भव्य ते- ते या राज्याने पाहिले इतका गौरवशाली इतिहास या राज्याला आहे.

राज्यनिर्मितीचा इतिहास अनेक घटनांनी भरलेला आहे. त्यामागे मराठी भाषा, संस्कृतीची विचारधारा आहे. महाराष्ट्राला स्वतःची आगळीवेगळी ओळख आहे. एका मुंबईचा इतिहास पाहिला तर ब्रिटिश काळात आणि स्वातंत्र्यानंतर अनेक भव्य वास्तू अस्सल मराठीजनांनी बांधल्या आहेत. मुंबईची पायाभरणी कोणी केली याचा इतिहास लिहिताना ब्रिटिशांसोबत मराठी बहाद्दरांचा उल्लेख करावाच लागतो.

केवळ मुंबई, कोकण नव्हे, तर वऱ्हाड प्रांतातील अनेक मान्यवरांचे नाव आदराने घ्यावे लागेल, अशी कर्तबगारी या राज्यातील मान्यवरांनी नोंदविली आहे. पण पक्षीय राजकारणाने जसजशी उचल खाल्ली व सामान्यांच्या दैनंदिन जीवनाची सर्व क्षेत्रे व्यापून टाकली तशी इतर क्षेत्रे मागे राहू लागली. सर्वांवरच सत्ताकारण, सरकार, मायबाप सरकार याभोवती पिंगा घालण्याची वेळ आली. सर्व गोष्टी मंत्रालयातून नियंत्रित होऊ लागल्या, तसतसा समाजजीवनाचा पोत बदलत गेला.

हे फार आक्षेपार्ह आहे असेही नाही. पण इतर क्षेत्रांत राजकारण व सरकार यांनी किती लुडबुड करावी याला मयार्दा राहिली नाही. त्यामुळे सत्तापक्षापेक्षा वेगळी विचारसरणी असलेली माणसे शांत राहणे पसंत करू लागली. राजकारणात दंडेलशाही वाढली तशी वैचारिक मोठेपण असलेली माणसे खुजेपणात समाधान मानू लागली. वेगळा विचार मांडला तर आपल्याला संरक्षण मिळेल का, याची धास्ती वाटू लागली. सर्व प्रकारच्या विचारधारांना सामावून घेणारा, सर्वांना त्यांचे आवश्यक ते स्वातंत्र्य बहाल करणारा महाराष्ट्र आता राहिलाय का, हा प्रश्न आहे. मराठी केवळ महाराष्ट्रात बोलली जाते किंवा मराठीच्या श्रीमंतीत केवळ महाराष्ट्रानेच भर घातली आहे असे नाही. गोवा राज्य, तसेच कर्नाटक, तेलंगणा, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात या राज्यातील मराठीबहुल भागांनी आपापल्या परीने साहित्य, संस्कृती यात योगदान दिले आहे.

अशा भव्यदिव्य इतिहासाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राची देशपातळीवर आज काय ओळख असावी? तर मंत्र्यांचे, नेत्यांचे, त्यांच्या समर्थकांचे वागणे-बोलणे, त्यांच्याकडून लोकांना मिळणारी वागणूक, त्यांची असहिष्णु विधाने, त्याचबरोबर पक्षापुरता संकुचित विचार, त्यातून निर्माण झालेले अनेक प्रश्न, उद्योग, रोजगार या विषयांच्या बातम्या देशाच्या इतर भागात महाराष्ट्राची नवी ओळख सांगत आहेत.

# महाराष्ट्र राज्य असे नव्हते...



महाराष्ट्राला स्वतःची आगळीवेगळी ओळख आहे. जे- जे उज्वल आणि भव्य ते-ते या राज्याने पाहिले इतका गौरवशाली इतिहास या राज्याला आहे. अशा भव्यदिव्य इतिहासाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राची आज देशपातळीवर काय ओळख झाली असावी?

मराठीभाषिक प्रदेश हे कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे, असे महात्मा गांधी म्हणत. आता त्याचे रुपांतर आग्यामोहोळात झाले आहे, असे म्हणावे लागते. कार्यकर्ते बेताल वर्तन करू लागले आहेत. दांडगाई करणे हा त्यांचा स्थायीभाव झाला आहे. वात्रट, हिंसक प्रतिक्रिया देणे हे महत्त्वाचे काम झाले आहे. हे सारे कशासाठी, तर आपापल्या नेत्याचे महत्त्व कायम रहावे आणि वचक रहावा म्हणून. पण असा वचक चिरस्थायी असतो?

एकेकाळी महाराष्ट्रामध्ये शासन, प्रशासन यात कमालीची शिस्त होती. लोकांच्या नेमक्या गरजा काय आहेत हे पाहून धोरणे आखली जात. मोफतची संस्कृती नको म्हणूनच तर रोजगार हमी योजना आली व पुढे ती देशाने स्वीकारली. आता तर काम करा अथवा न करा, महिन्याला ठराविक रक्कम बँकेत जमा होईलच अशा योजना आल्या आहेत. जे प्रामाणिकपणे कष्ट करतात, वेळेवर कर देतात, त्यांचा आपण अवमान करतोय ही भावनाही कोणाच्या गावी नाही. पूर्वी लोकानुनय आणि गैरवाजवी मागण्या मान्य करण्याचा आग्रह कोणी धरला तर समोर खडसावणारे मंत्री, मुख्यमंत्री या राज्याने पाहिले. मंत्र्यांचे बेताल वागणे सोडाच. पण, शिस्तीच्या चौकटीबाहेर जाणेही कधी खपवून घेतले गेले नाही.

पूर्वी राज्यमंत्र्यांनाही मंत्रिमंडळ बैठकीत सामावून घेतले जाई. स्व. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री होते तेव्हा एक राज्यमंत्री मंत्रीमंडळाची बैठक असतानाही आपल्या गावी निघाले. जात असताना गैरहजेरीबद्दलचे कारण नमुद करणारे पत्र मुख्यमंत्री कार्यालयात दिले होते. ते पत्र चव्हाण यांना दाखवले गेले तेव्हा त्यांनी असे सांगितले की, मंत्रीमंडळाच्या बैठकीशिवाय काहीही महत्त्वाचे असू शकत नाही. मंत्रिमंडळ बैठकीला गैरहजर राहण्याची विनंती अमान्य करण्यात आली आहे, हा निरोप त्या मंत्रीमहोदयांना तत्काळ कळवा व त्यांना परत बोलवा. तेव्हा थेट रेल्वेगाड्या कमी होत्या. मनमाड, कुडुर्वाडी अशा जंक्शनवर रेल्वेगाडी बदलावी लागे. हे राज्यमंत्री गाडी बदलण्यासाठी जंक्शनवर उतरले तेव्हा रेल्वे पोलिसांनी वायरलेसवर मुंबईहून आलेला संदेश कानावर घातला. तेव्हा त्यांनी परतीची गाडी पकडून मुंबई गाठली.


तेव्हा मंत्रिमंडळ बैठक सुरू झाली की, सभागृहाचे दरवाजे बंद केले जात. उशीरा आलेल्या मंत्र्यांना आल्या पावली परत फिरावे लागे. ही होती शिस्त आणि दरारा. पुढे तर परिस्थिती एवढी बदलली की, अनेकजण बैठक सुरू झाल्यावर बऱ्याच विलंबाने बैठकीसाठी जाताना दिसतील. कोणी कोणाचा वाढदिवस, जिल्हा बँकेची निवडणूक, साखर कारखान्याची निवडणूक असे कारण सांगूनही गैरहजर राहिल्याचे आढळून येईल.

मंत्रीपदाचे गांभीर्य कसे जपले पाहिजे, त्यामागची भावना काय आहे, हाही एक मुद्दा आहे. मंत्री होण्याची हौस असेल, जनसेवा करण्याची इच्छा असेल, तर या पदाचा आबसुद्धा राखला गेला पाहिजे. आपल्या वागण्याने, बोलण्याने या पदाची प्रतिष्ठा कमी होईल, असा विचार केला तरच हे शक्य आहे. मागे एका बैठकीत तत्कालीन मंत्री एसएमआय असीर डुलक्या घेत होते, अशा बातम्या आल्या तेव्हा केवढा गदारोळ माजला होता. अलीकडे मंत्री कशा-कशासाठी बातम्यात येत आहेत, हे पाहिले तर डुलक्या हा फारच सौम्य विषय झाला.

मंत्री होण्यासाठी तीव्र स्पर्धा आहे. ४३ सदस्यांच्या मंत्रीमंडळात कोणाकोणाला सामावून घ्यावे हा प्रश्न आहे. एका विभागाचे चार-चार विभाग झाले आहेत. पूर्वी एकेका मंत्र्याकडे चार-पाच वजनदार खाती असत. मंत्रीपद मिळविणे हा राजकीय क्षेत्रातील प्रतिष्ठेचा विषय आणि ध्येय झाले आहे. मंत्रीपद मिळविणे एकवेळ सोपे. पण ते टिकविणे तितके सोपे नाही. पण मंत्रीपद गांभीयार्ने सांभाळले जाताना दिसत नाही. आपण राज्यघटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली आहे याचेही भान काहीना दिसत नाही.

आपल्या धोरणांवर, निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना नामोहरम करत रहा, असा अजेंडा सगळ्यांनाच आवडू लागला आहे. आपल्यापुढे मांडले जाणारे विषय बरोबर की चूक हे पाहण्यापेक्षा अडचणीचा विषय कोणी आणला, त्याचा बंदोबस्त कसा करता येईल, यावर भर दिला जात आहे. एकेकाळी अनेक चांगल्या गोष्टींसाठी महाराष्ट्राकडे पाहिले जाई. अनेक कल्पक उपक्रमांची सुरूवात या राज्यात झाली आहे. आता प्रतिष्ठा वाढतेय की कमी होतेय, याचेही भान राहिलेले नाही. लोकजीवनातील अनेक चांगल्या गोष्टींना संरक्षण देणारे, सर्वांना प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणारे, विचारांची मोकळीक जपणारे राज्य संकुचित होऊ लागले आहे. खरे पाहता रसरशीतपणा, जीवंतपणा संपवून विदीर्ण झालेल्या समाजमनावर अधिकार गाजवण्यात कसले शौर्य आहे?

# 'टेस्ला'च्या निमित्ताने...




गुळगुळीत, खड्डेविरहित, टिकाऊ रस्ते हे समस्त भारतीयांनी पिढ्यानपिढ्या पाहिलेले स्वप्न. काळाच्या ओघात या स्थितीत काही सकारात्मक बदल होताना दिसत असले तरी अद्याप बराच पल्ला गाठणे बाकी आहे. या पार्श्वभूमीवर एलन मस्क यांची टेस्ला ही स्मार्ट ई-कार मुंबईत व पर्यायाने भारतात दाखल झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टेस्लाच्या मुंबईतील पहिल्या शोरूमचे उद्घाटन करताना या कंपनीला मोटारनिर्मितीसाठी महाराष्ट्रात येण्याचे आमंत्रणही दिले. 'आमचे सरकार उद्योगस्नेही आहे, येथे व विशेषतः करून मुंबईत उद्योगांना चांगली वागणूक दिली जाते,' असा संदेश त्यातून देण्याचा सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न असावा. तसे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. जागतिक बाजारपेठेचा विचार केल्यास चीन व अमेरिकेनंतर भारताचा क्रमांक लागतो. भारतात अनेक देशी-विदेशी कंपन्यांची पाळेमुळे या उद्योगांत रुजली आहेत. काही वर्षांपासून ई-कारचा बोलबाला सुरू आहे. सुरुवातीच्या काळात भरधाव असणारी ई-कारची वाटचाल आता काहीशी मंदावली आहे. सरकारकडून अनेक सवलती देऊनही सद्यस्थितीत भारताच्या एकूण वाहनविक्रीमध्ये ई-वाहनांचा हिस्सा अवघे आठ टक्के आहे व त्यातही दुचाकी, तीनचाकींचा हिस्सा अधिक आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे, या कारच्या किमती. या कारच्या महत्त्वाच्या सुट्या भागांसाठी आपण आजही आत्मनिर्भर नाही. या कारची 'रिसेल व्हॅल्यू'ही कमी आहे व त्या न विकता तशाच बाळगल्या तरी काही वर्षांनंतर येणारा बॅटरीबदलाचा खर्च वारेमाप आहे. ई-कार आपल्या रस्त्यांवर मोठ्या संख्येने दिसू लागल्या असल्या, तरी त्याची व्यवहार्यता सिद्ध होण्यास काही काळ जावा लागेल.

# कोंडीच्या खताला मुत्सद्देगिरीचा उतारा!

**भारतीय अर्थव्यवस्थेची कोंडी करण्याचा डाव हाणून पाडण्यात केंद्र सरकारला यश आले आहे. मुत्सद्देगिरीतून भारताने खेळलेले डावपेच यशस्वी झाले आहेत. इथून पुढेही असेच होणे आवश्यक आहे.**

गेल्या वर्षापासूनच भारतीय अर्थव्यवस्थेभोवती एक अदृश्य वादळ घोंघावत होते. त्याची फारशी कल्पना भारत सरकारला आली नाही. या वर्षाची सुरुवात होताच ते वादळ आणखी मोठे होऊ लागले. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबविले. त्यानंतर मात्र, भारतीय अर्थव्यवस्थेला जबर हानी पोहचविण्याचा चंग झाला. मान्सूनचा वर्षाव सुरू होत असतानाच या वादळाने वेग घेतला. पण, हे वादळ थोपविण्यात अखेर भारत सरकारला यश आले आहे. शह देण्याच्या प्रयत्नांना थेट काटशह देऊन भारताने बाजी उलटवली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर ही बाब आता ठळक झाली आहे.

भारताचा शेजारी असलेला आणि महासत्तेकडे मार्गक्रमण करणारा चीन हा कुटील कारस्थानांसाठी ख्यात आहे. खासकरून भारताविरोधात त्याचे डावपेच सतत सुरू असतात. आताही चीनने भारतीय कृषी क्षेत्राला लक्ष्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले खरे, पण त्याला त्यात पूर्णतः यश आलेले नाही. भारतीय अर्थव्यवस्थेत आजही सर्वात मोठा वाटा आहे तो कृषी क्षेत्राचा. सर्वाधिक म्हणजे देशातील तब्बल ५८ टक्के रोजगार याच क्षेत्रावर अवलंबून आहे. देशाच्या जीडीपीमध्ये या क्षेत्राचे योगदान सुमारे १७ टक्के आहे. याशिवाय देशाची अन्न सुरक्षा अबाधित ठेवण्याचे कामही हेच क्षेत्र करते. त्यामुळेच भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान आहे. जगातील पहिल्या क्रमांकाची सव्वा अब्जहून अधिक लोकसंख्या भारतात आहे. हीच लोकसंख्या ग्राहकही आहे. म्हणजेच इथली बाजारपेठ तगडी. तसेच वस्तू, पदार्थ आणि अन्नधान्यालाही भरमसाट मागणी. हे सारे लक्षात घेऊन चीनने भारतीय अर्थव्यवस्थेला फटका देण्यासाठी थेट कृषी क्षेत्रालाच हात घालण्याचे निश्चित केले. असेही भारतासोबतचे संबंध २०२० पासून ताणले गेलेले आहेतच. २०२३ पासून चीनने भारताला पुरविण्यात येणाऱ्या डीएपी या खताच्या पुरवठ्यात कपात केली. २०२४ मध्ये त्यात आणखी वाढ केली. भारतीय बाजारपेठ आणि शेतकऱ्यांना त्याची झळ पोहचली. मागणी आणि पुरवठ्याचे संतुलन बिघडल्याने सहाजिकच देशांतर्गत बाजारपेठेत खतांचे दर वाढले. तसेच, वेळेवर खत उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. २०२५ हे वर्ष सुरू होताच चीनने आणखी फास आवळला. डीएपीचा पुरवठा पूर्णपणे ठप्प केला. विशेष म्हणजे, त्याची अधिकृत घोषणा त्यांनी केली नाही. म्हणजेच भारत सरकारच्या लेखी चीनने उघड बंदी केली नव्हती. त्यामुळे अधिकृतपणे चीन सरकारशी बोलणी करण्याचा प्रश्नच उद्भवला नाही.

आता प्रत्यक्षात आकडेवारीमधून या समस्येची तीव्रता लक्षात घेऊया. भाराला वषार्काठी ५५ दशलक्ष टन खते लागतात, तर डीएपीची मागणी ११ दशलक्ष टन एवढी आहे. तब्बल ९० टक्के खते भारतात आयात केली जातात. २०२३-२४ मध्ये भारताने चीनकडून २१.४८ लाख टन युरिया आणि २२.८७ लाख टन डीएपीची आयात केली. हीच आकडेवारी २०२४-२५ मध्ये अनुक्रमे १.०४ लाख मेट्रिक टन आणि ८.४३ लाख मेट्रिक टन एवढी झाली. आता २०२५ मध्ये तर ती नगण्यच आहे. भारताला खते पुरवण्यात पहिल्या क्रमांकावर चीन, नंतर सौदी अरेबिया, रशिया, ओमान, अमेरिका, मोरोक्को हे देश आहेत. भारताकडून होणाऱ्या एवढ्या जबरदस्त मागणीचा पुरवठा करण्याची क्षमता चीन वगळता अन्य देशांची नाही. त्यामुळे भारतीय बाजारपेठेत डीएपीसह खतांचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. गेल्याच महिन्यात डीएपीचे दर ५२५ डॉलर एवढे होते. ते या महिन्यात थेट ८१० डॉलरपर्यंत पोहचले आहेत. या भडक्याने शेतकऱ्यांची चांगलीच होरपळ होत आहे. भारतात सर्वाधिक शेती ही मान्सून काळात होते. म्हणजेच खरीपाचे पीक लाखो शेतकऱ्यांसाठी जीवदान असते. मात्र, चीनने खेळलेल्या डावामुळे खतेच उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. भारताने यासंदर्भात अन्य देशांशी चर्चा करण्यास प्रारंभ केला. देशांतर्गतही उत्पादन वाढवता येईल का याचीही पडताळणी केली. मात्र, फारसा सकारात्मक प्रतिसाद लाभला नाही. हे म्हणजे तहान लागल्यावर विहीर खोदण्यासारखे झाले.




सेंद्रीय शेतीविषयी जनजागृती होत असली तरी शेतकरी त्यास फारसा प्रतिसाद देत नाहीत. कारण, उत्पन्न आणि उत्पादन. शेती ही हवामान आधारित आहे. लहरी हवामानामुळे विविध प्रकारची कीड किंवा रोग तयार होऊन हातातोंडाशी आलेला घास जातो. रसायनांद्वारे तयार करण्यात आलेली खते, कीटकनाशके वापरण्याला शेतकरी अधिक प्राधान्य देतात. खते वापरल्याने उत्पादनात वाढ होते. यातूनच उत्पन्नही चांगले येते. भाजीपाल्यापासून फळबागांपर्यंत साऱ्याच पिकांसाठी खते सर्रास वापरली जात आहेत. अनेकदा तर खतांचा वापर अधिक होतो. त्यातून जमिनीची सुपिकता धोक्यात येते. यासंदर्भात जनजागृतीचा मोठा अभाव आहे. असो. म्हणजेच भारतीय कृषी क्षेत्राची सारी मदार खतांवर पूर्णपणे अवलंबून आहे. अचानक खतांचा तुटवडा निर्माण झाल्याने त्याचे दृश्य परिणाम सध्या दिसत आहेत. खरीपाची पिके जेव्हा काढणीला येतील तेव्हा त्याची तीव्रता आणखी दिसून येईल.

भारत सरकारपुढे हे एक मोठे आव्हानच होते. म्हणूनच सरकारने यासंदर्भात आपले मित्र देश असलेल्या सौदी अरेबिया आणि मोरक्को यांच्याशी वातार्लाप सुरू केला. अचानक खतांचा मोठा पुरवठा करणे त्यांना शक्य नसले तरी तो हळूहळू वाढविण्याचा प्रस्ताव देण्यात आला. राजनैतिक पातळीवरील संबंध आणि चर्चांचा फायदा येथे झाला. या दोन्ही देशांच्या सरकारांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. चर्चेच्या अनेक फेऱ्यांनंतर अखेर सौदी अरेबियाकडून १० लाख मेट्रिक टनाऐवजी ३१ लाख, तर मोरक्कोकडून ५ लाख मेट्रिक टनावरून ७ लाख मेट्रिक टन डीएपीचा पुरवठा करण्यात येणार आहे. तसा करार या दोन्ही देशांसोबत झाला आहे. खरीप पिकांसाठी खतांची टांगती तलवार राहिली. आता रब्बीच्या हंगामासाठी खते योग्य प्रमाणात उपलब्ध व्हावीत यासाठी भारत सरकारने इजिप्त, नायजेरिया, टोगो, मॉरिटानिया, ट्युनिशिया या देशांशी बोलणी सुरू केली आहे. त्यात यश आले तर खतांचा पुरवठा चांगल्या पद्धतीने होऊ शकेल. तसेच, देशांतर्गत उत्पादन वाढविण्यासाठीही सरकारने पावले उचलली आहेत. लहान आणि मोठ्या उत्पादकांना त्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.

डीएपीच्या निर्मितीत वापरले जाणारे घटक हे इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरी निर्मितीसाठीही उपयुक्त ठरत असल्याने डीएपी किंवा एकूणच खतांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. म्हणजेच, खते आणि ईव्ही बॅटऱ्या या दोघांसाठी रसायनांची मागणी लक्षणीयरीत्या वाढली आहे. चीनचा या दोन्ही क्षेत्रात जगभरात दबदबा आहे. दरम्यान, या साऱ्या कारस्थानात चीनला वाटले की खतांसाठी भारत आपली मनधरणी किंवा आर्जव करेल. पण प्रत्यक्षात तसे घडलेले नाही. भारताने इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक तसेच अन्य क्षेत्रातही गतिमान पावले उचलणे आवश्यक आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी टीव्ही उत्पादन करणाऱ्या भारतीय कारखान्याला नुकतीच भेट दिली. टीव्ही निर्मितीसाठी लागणारे तब्बल ८० टक्के सुटे भाग हे चीनमधून आयात केले जातात.

परिणामी भारतात केवळ जुळणी होत असल्याचे त्यांना दिसून आले. हे सारे मोबाईल, एअरपॉड्स, ब्लूटूथ आणि अन्य उत्पादनांसाठीही लागू आहे. त्यामुळे चीनवरील अवलंबित्व किती काळ ठेवायचे हे ठरवावे लागेल. दुर्मिळ खनिजांचाही पुरवठा ठप्प करून चीनने बेभरवसा आणखी निर्माण केला आहे. 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया'सारख्या उपक्रमांची व्याप्ती अफाट गतीने वाढविणे हाच सक्षम पर्याय आहे. खत आणि दुर्मिळ खनिजांच्या प्रकरणावरून भारत सरकारने योग्य तो धडा घेतला असेल तर आगामी काळात चीनच्या चाली निरर्थक ठरतील आणि त्याने काही डाव टाकलेच तरी भारताला त्याची झळ पोहचणार नाही. जागतिकीकरणाच्या युगात हा एक महत्त्वाचा अध्याय आहे.

बिहार विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर मतदारयाद्यांतील तब्बल ५१ लाख नावे वेगवेगळ्या कारणांमुळे वगळण्याची निवडणूक आयोगाची प्रक्रिया वादाच्या भोवऱ्यात सापडणे साहजिक म्हणावे लागेल. चुरशीच्या निवडणूक निकालांवर परिणाम करण्यासाठी हे सात टक्के इतके प्रमाण पुरेसे ठरू शकते; त्यामुळेच या मुद्द्यावरून संसदेपासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत मंथन-गदारोळ सुरू आहे.

बिहारमध्ये आयोग मतदारयादीबाबत विशेष पुनरीक्षण मोहीम (एसआयआर) राबवत असून, त्यामध्ये मतदारयाद्यांतील १८ लाख जण मृत असल्याचे आढळले. २६ लाख मतदार स्थलांतरित आहेत अन् सात लाख मतदारांची अन्य राज्यांच्या मतदारयादीत नावे (दुबार) असल्याचे समोर आले आहे. यातील मृत मतदार वगळता अन्य ३३ लाख मतदारांवर मतदानापासून वंचित राहण्याची टांगती तलवार यामुळे उभी राहिली आहे. एक ऑगस्ट रोजी प्राथमिक मतदारयादी प्रसिद्ध होणार असून हरकती-सूचनांचे निराकरण केल्यानंतर ३० सप्टेंबर रोजी अंतिम यादी प्रसिद्ध होईल. पुरावे देण्यास असमर्थ ठरणाऱ्यांची नावे यादीतून वगळण्यात येणार असल्याने सर्वत्र पसरलेल्या अस्वस्थतेचे निराकरण करणे, ही आयोगाचीच जबाबदारी आहे.

या मोहिमेची घोषणा झाल्यापासून या प्रक्रियेवर आक्षेपांची जंत्रीच मांडण्यात येत आहे. मतदारयादीत वर्षानुवर्षे असलेल्या चुका दुरुस्त करण्याबाबत सुस्त राहिलेल्या आयोगाने निवडणुकीपूर्वी हाती घेतलेल्या मोहिमेबाबत शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे. यापूर्वी राबविलेल्या या मोहिमेसाठी दीड वर्ष लागले होते. यंदा जवळपास महिन्याभरातच मतदारयादीच्या ९७ टक्के, म्हणजे सात कोटींहून अधिक नागरिकांच्या घरोघरी जाऊन माहिती गोळा करण्याचा निवडणूक आयोगाचा वेग चकित करणारा; खरे तर शंकास्पद आहे. प्रारंभी आयोगाने २००३नंतर नावे नोंदविलेल्या मतदारांकडून जन्मनोंदणी प्रमाणपत्रांसोबत आई-वडिलांचे दाखलेही बंधनकारक ठरवले होते. आधार आणि रेशनकार्ड यांसह खुद्द निवडणूक आयोगाने दिलेले मतदार ओळखपत्र हासुद्धा ओळखीचा पुरावा मानण्यास नकार दिला होता. बिहारमध्ये जन्म नोंदणीचे प्रमाण जवळपास ७० टक्के आहे; आई-वडिलांचे प्रमाणपत्र मिळणे अनेकांसाठी अशक्यप्राय आहे.

राज्यातील ४० टक्क्यांहून अधिक नागरिकांकडे आयोगाने मागितलेल्यांपैकी कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाही. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मोहीम राबविण्याचा आयोगाचा अधिकार मान्य करतानाच मतदारांचे आधार, मतदार ओळखपत्र आणि रेशनकार्ड हे ओळखीचा पुरावा म्हणून गृहीत धरण्याचा आदेश दिला. त्यानंतर आयोगाने पूर्वीचा पवित्रा बदलून ही कागदपत्रे स्वीकारणे सुरू केले आणि काही अटीही शिथिल केल्या. बिहारमधील भूमिहीन-बेघर व अनेक अशिक्षित नागरिकांकडे पत्त्याचा किंवा ओळखीचा कोणताही पुरावा नाही. स्थलांतरितांपर्यंत ही मोहीम पोहोचलेलीच नाही. अशा स्थितीत दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या हजारो कुटुंबांकडे बँक खात्यांचे पुरावे येणार कोठून, हा प्रश्न आहे. त्याचे उत्तर आयोगाकडेही नाही.




'मतदानाचा हक्क मिळविण्यासाठी नागरिकत्व, वय आणि पत्ता अशा पात्रता आवश्यक असून त्यांची पूर्तता केल्यावरच हा हक्क मिळू शकतो,' ही निवडणूक आयोगाने न्यायालयात मांडलेली भूमिका योग्य असून, त्यांच्या तपासणीबाबत आयोगाच्या अधिकारांबाबतही शंका नाही; त्यामध्ये नागरिकत्वाच्या 'तपासणी'चा अधिकार आयोगाला हेही मान्य आहे; परंतु अंतिम निर्णयाचा अधिकार गृह मंत्रालयास असल्याने या अल्पावधीत त्यावर निर्णय कसा घेणार, हा विरोधकांचा प्रमुख आक्षेप आहे.

निवडणूक आयोगाच्या घोषणेप्रमाणे लवकरच देशभरात सुरू होत असलेल्या मोहिमेसाठी बिहार ही प्रयोगशाळा ठरणार आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात अशी मोहीम राबवणे मुळीच सोपे नाही. बिहारमध्ये समोर आलेल्या अडचणी विचारात घेऊन, तसेच सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घेऊन कायदेशीरदृष्ट्या निर्दोष आणि व्यावहारिकदृष्ट्या सुलभ कार्यपद्धती अंगीकारली, तरच देशव्यापी मोहीम यशस्वी होऊ शकते. त्यासाठी आडमुठेपणा सोडावा लागेल.

अपात्र मतदारांना वगळून मतदारयादी 'स्वच्छ' झालीच पाहिजे, याबाबत दुमत नाही; मात्र त्याबरोबरच पात्र मतदारांना मतदानापासून वंचित ठेवणे हे मतदानाचा टक्का वाढवण्याच्या आयोगाच्याच घोषणेशी फारकत घेणारे ठरेल, याचीही जाणीव ठेवली पाहिजे. निवडणूक सुधारणा, हा देशातील लोकशाही मजबूत करण्याचा पाया आहे. मात्र, हा प्रामाणिक उद्देश कृतीतून दिसला पाहिजे. विरोधकांवर चालविलेले राजकीय अस्त्र म्हणून त्यांचा वापर होणे गैर आहे व ते निवडणूक आयोगाची पारदर्शकता आणि निस्पृहतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.



## छोले सॅलड

**साहित्य :** २०० ग्रॅम छोले (७-८ तास भिजवून उकडून घेतलेले), १ कांदा बारीक चिरलेला, २ चेरी टोमॅटो बारीक चिरलेले, वरून भुरभुरण्यासाठी पार्सली, २ चमचे ऑलिव्ह ऑइल, २ चमचे बारीक चिरलेली लसूण, १ चमचा चिली फ्लेक्स, २-३ चमचे लिंबाचा रस, मीठ, मिरपूड.

**कृती:** एका वाडग्यामध्ये लसूण, ऑलिव्ह ऑइल, मीठ मिरपूड, चिली फ्लेक्स आणि लिंबाचा रस एकत्र ढवळून घ्या. उकडलेल्या छोल्यांमध्ये ते मिसळा. आता यात कांदा, टोमॅटो घालून घ्या. नीट मिसळून थंड करायला ठेवा. वरून पार्सली भुरभुरा. छोले चाट आपण नेहमीच करतो पण हे आणखी थोडं वेगळ्या चवीचं सॅलड. यामध्ये छोल्यांऐवजी राजमाही वापरता येईल. पॅन टॉस करून पास्ताही त्यात मिसळता येईल.

# तरुण दिसायचे आहे, मग तुमच्यासाठी खास टिप्स...

**सर्वच तरुणींना आपली त्वचा सुंदर असावी, आपण छान दिसावे असे वाटत असते. मात्र सर्वांनाच ते जमत नाही, कारण आपण जो फेस पॅकचा वापर करतो तो तितकीच त्वचा गोरी करतो. तुमच्या शरीराचा प्रत्येक भाग छान दिसण्यासाठी आम्ही तुम्हाला देत आहोत काही खास टिप्स, त्या पुढीलप्रमाणे :**



■ ज्या लोकांना कोणतीही ॲलर्जी असते अशा लोकांनी मध व दुधात स्नान करणे फायदेशीर असते. या स्नानामुळे त्वचेला अंतर्गत पोषण मिळते. ■ त्वच्या कोमल होण्यासाठी दूध आणि मध एकत्र मिक्स करून स्नान केल्यास त्वच्या कोमल राहते. दुधामधील प्रोटीन आणि फॅटचे प्रमाण त्वचेला आतून एक्सफोलिएट करण्याचे काम करते. याव्यतिरिक्त दुधातील लॅक्टिक ॲसिड मृत पेशींना दूर करण्याचे काम करते. त्यामुळे त्वचेवरील ड्रायनेस कमी होतो. ■ तसेच या स्नानामुळे तुम्ही लवकर वृद्ध होणार नाही त्यामुळे तुमची त्वचा तरुण दिसते. ■ मध आणि दूध एकत्रित घेतल्यास थेट नर्व्हस सिस्टमवर प्रभाव पडतो. दूध त्वचेला कोमल बनवते तर मध त्वचेला नवजीवन प्रदान करते. ■ अरोमासाठी सी सॉल्ट आणि लेव्हेंडर ऑइल वापरले जाते. तणाव दूर करण्यासाठी सुद्धा या मिश्रणाने स्नान केले जाते.

# धणे-हळदीच्या मिश्रणाने दूर करा पिंपल, ब्लॅकहेड्सची समस्या!



**चेर्हयावरचे** डाग, ॲक्ने, ब्लॅकहेड्सच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही ब्युटीपार्लरमध्ये काही ट्रीटमेंट्स घेतल्या असतील. पण काही घरगुती उपायांनी अगदी सुरक्षितरित्या तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता. असाच एक उपाय म्हणजे 'धणे'!

**फायदेशीर उपाय -** धण्याचं (कोथिंबीरीच्या बिया) पाणी आणि हळद एकत्र करून चेर्हयाला लावावे. यामधील ॲन्टीबॅक्टेरियल गुणधर्म त्वचेवर पिंपल्सची निर्मिती करणाया बॅक्टेरियांचा नाश करतात. कोथिंबीरीमध्ये 86.3% मॉईश्चर असते. यामुळे त्वचा रिहायड्रेट होण्यास मदत होते. यामुळे चेर्हयावरील डाग कमी होण्यास मदत होते. हळद आणि कोथिंबीर या दोन्हींमध्ये ॲन्टीऑक्सिडंट्स आणि व्हिटामिन्सचा मुबलक साठा असल्याने त्वचेचा पोत सुधारण्यासाठी मदत होते.



**साहित्य-**

▮ दोन चमचे धणे ▮ चमचाभर हळद ▮ ग्लासभर पाणी

**कसे बनवाल मिश्रण**

▮ ग्लासभर पाण्यात धण्याचे दाणे टाकून पाणी उकळा. पाण्याचा रंग बदलल्यानंतर गॅस बंद करा. मिश्रण थंड झाल्यानंतर पाणी गाळून घ्या. ▮ या पाण्यात थोडी हळद मिसळून पेस्ट बनवा. मात्र अतिप्रमाणात हळद वापरू नका, अन्यथा चेहरा पिवळा होईल. ▮ रात्री हे मिश्रण चेहऱ्याला लावा आणि सकाळी चेहरा स्वच्छ धुवा. ▮ सतत तीन-चार रात्री हा प्रयोग केल्यास तुमच्या चेहऱ्यावरील डाग, ॲक्ने कमी होण्यास मदत होईल.

# म्हातारपणात सर्वात जास्त होतात हे ३ आजार, ५० वर्षांचे झाले असाल तर सावध व्हा

**म्हातारपणात** मनुष्याला काही आजारपण जास्त त्रास देतात. हे आजार म्हातारपणाचे दुखणे अधिक वाढवतात. एक्सपर्टचे म्हणणे आहे की, वाढत्या वयात मनुष्याच्या शरीराची प्रतिरोधक क्षमता कमी होऊ लागते आणि त्याला बरेच आजार होऊ लागतात. पण काही असे आजार आहे जे ५० वर्षांहून जास्त वयाच्या महिला आणि पुरुषांना सर्वात जास्त होतात. तर जाणून घेऊ कोणते गंभीर आजार आहेत जे ५० वर्षांनंतर जास्त होतात.

### हृदयरोग


सेंटर्स ऑफ डिसिज कंट्रोल ॲंड प्रीव्हेंशनचे म्हणणे आहे की, अमेरिकेत हृदयरोग पहिल्या क्रमांकावर आहे, जो म्हाताऱ्यांमध्ये जास्त दिसून येतो. ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर हा आजार वाढू लागतो. भारतीय म्हाताऱ्यांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात आढळून आला आहे.

### कर्करोग

सेंटर फॉर डिसिज कंट्रोलचे म्हणणे आहे की, हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर म्हाताऱ्यांमध्ये होणारे आजार म्हणजे कर्करोग. अमेरिकेत हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात जास्त मृत्यू कर्करोगामुळे होते. ५० वर्षांनंतर पुरुषांमध्ये लंग कर्करोगाचा धोका वाढू लागतो. तसेच महिलांमध्ये या वयात सर्वात जास्त स्तन कर्करोगाची लक्षणे दिसू लागतात. फुफ्फुस आणि स्तन कर्करोगानंतर पोटाचा आणि प्रोटेस्टेट कर्करोगाचा धोका वाढू लागतो.

### स्ट्रोक

स्ट्रोक मस्तिष्क संबंधी आजारांमध्ये सर्वात सामान्य आजार आहेत. अमेरिकेत हार्ट ॲटॅक आणि कर्करोगानंतर सर्वात जास्त रुग्णांचा मृत्यू या आजारामुळे होतो. हे आजार सर्वात जास्त म्हाताऱ्या लोकांना प्रभावित करतात.



# असे बनवा लोणचे, तर वाढेल चव आणि रंगत...

**कैरीचे लोणचे, लिंबाचे लोणचे, मिरचीचे लोणचे, व्हेज लोणचे, अनेक प्रकाराचे लोणचे घरी अगदी आरामात तयार केले जातात. पण हेच लोणचे अधिक चविष्ट बनवण्यासाठी काही सोप्या टिप्स. याने लोणचाच्या रंगही आकर्षक दिसेल.**

▮ रंग आणि चव हे दोन्ही वाढवण्यासाठी लोणच्याचा तेलात गरम न करता मोहरीचे तेल घालायला हवं ▮ गोड आंब्याच्या लोणच्यात साखर मिसळून गॅसवर शिजवावे. ▮ चविष्ट लोणचे बनवण्यासाठी कुटलेली नव्हे तर अख्खी मोहरी वापरायला हवी.



# टेम्पर्ड ग्लास असूनही का खराब होते मोबाइल स्क्रीन

**फोनच्या स्क्रीनला संरक्षण देण्यासाठी तुम्ही देखील टेम्पर्ड ग्लास वापरत असाल. बऱ्याच प्रसंगी हे टेम्पर्ड ग्लासेस फक्त फोन स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण, गार्ड डिस्प्ले क्रॅक होण्यापासून वाचवू शकत नाहीत.**

**स्मार्टफोनला** कोणत्याही प्रकारचे नुकसान पोहचू नये आणि संरक्षणाचा अतिरिक्त स्तर देण्यासाठी युजर्स स्क्रीन गार्ड वापरतात. बाजारात अनेक प्रकारचे स्क्रीन गार्ड उपलब्ध आहेत. काही लोक त्यांना टेम्पर्ड ग्लास असेही म्हणतात. तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या विक्रेत्याकडून स्क्रीन गार्ड विकत घेतल्यास ते जवळपास १०० रुपयांमध्ये सुद्धा मिळेल. काहींना तर, तर ५० रुपयांतही मिळू शकतात. स्मार्टफोनच्या मॉडेलनुसार त्याची किंमत अनेक वेळा वाढते. दुसरीकडे, जर तुम्ही ऑनलाइन गेलात, तर तुम्हाला हे स्क्रीन गार्ड १०० रुपयांपासून ते १००० रुपयांपर्यंतच्या किमतीत मिळतात. स्क्रीन गार्डसाठी इतक्या किमती का? असा प्रश्न तुम्हालाही पडत असेल.



**स्क्रीन का तुटते ?**

तुम्हाला फोनची स्क्रीन स्क्रॅचपासून वाचवायची असेल, तर हे स्वस्त गार्ड हे काम अगदी सहज करू शकतात. परंतु, काही वेळा ते स्क्रीन तुटण्याचे कारणही बनते. डिस्प्लेवर जाड स्क्रीन गार्ड लावल्यानंतर स्क्रीन आणि कव्हरमधील अंतर संपते. यामुळे, तुमचा फोन पडताच, त्याचा परिणाम डिस्प्लेवर पडतो, जो स्क्रीन गार्ड नसेल तर, कमी होऊ शकते.

टेम्पर्ड ग्लास ऑनलाइन शोधल्यास तुम्हाला १०० रुपयांपासून ते २००० रुपयांपेक्षा अधिक किमतीचे गार्ड उपलब्ध असल्याचे दिसून येईल. महत्त्वाचे म्हणजे या टेम्पर्ड ग्लासची किंमत बाजाराच्या तुलनेत खूपच कमी आहे.

### महागड्या स्क्रीन गार्डमध्ये काय खास आहे?

बाजारात उपलब्ध असलेले स्वस्त टेम्पर्ड ग्लास किंवा स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या फोनच्या स्क्रीनला स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण तुमचा फोन पडला तर हे गार्ड त्यांना सुरक्षित करू शकत नाहीत. स्मार्टफोनची स्क्रीन तुटली नाही तर नशीबच. दुसरीकडे २००० रुपये खर्चून येणारे स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या स्क्रीनचे संरक्षण करू शकतात. हे गार्ड तयार करताना उत्तम तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यांना अशा पद्धतीने बनवण्यात येते की, पडदा पडल्यावर स्क्रीनवर थेट दाब येत नाही. त्याचबरोबर यामध्ये वापरण्यात आलेली काच देखील सामान्यपेक्षा खूपच वेगळी असते आणि हेच त्यांची किंमत जास्त असण्याचे कारण असते.

# उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी जीवनशैलीत करा हे बदल

**आजकाल** प्रत्येक वयोगटातील व्यक्तीला उच्चदाबाचा त्रास होताना दिसत आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी, चुकीची जीवनशैली, अधिक मिठाचं सेवन करणं किंवा तणावामुळे अनेक लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते. उच्च रक्तदाबमुळे (हाय ब्लडप्रेशर) हदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. त्यामुळे स्वस्थ राहण्यासाठी आपला रक्तदाब नियंत्रणात असणं गरजेचं आहे. उच्च रक्तदाबाची काही तशी खास लक्षणं नसल्याने तो हळूहळू शरीरात प्रभावित होत जातो. ही समस्या दूर करण्यासाठी दैनंदिन दिनचर्या सुरळीत ठेवणं, त्यात काही आवश्यक चांगले बदल करणं महत्त्वाचं आहे.

उच्च रक्तदाबाची समस्या नियंत्रित ठेवण्यासाठी आहारात फळं आणि हिरव्या भाज्यांचं सेवन करणं आवश्यक आहे. त्याशिवाय लो फॅट डेअरी उत्पादने, सुकामेवा, कडधान्यं यासारख्या पदार्थांचं सेवन करणं फायदेशीर ठरतं.

जेवणात मिठाचं प्रमाण कमी केल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या कमी होते. जे लोक दिवसांतून १५०० एमजीहून कमी मिठाचं सेवन करतात त्यांचा रक्तदाब नियंत्रणात राहतो. खाताना कधीही अन्नपदार्थांवरून मीठ टाकू नये.

वजन वाढल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या होते. त्यामुळे कॉलेस्ट्रॉल आणि मधुमेह वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे आपल्या उंचीप्रमाणे आपलं वजन नियंत्रणात असणं गरजेचं आहे.

नियमित व्यायाम करणं सर्व आजारांवर सर्वोत्तम उपाय आहे. व्यायामामुळे तणाव कमी करण्यासही मदत होते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. दररोज ३० मिनिटं व्यायाम करणं उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वोत्तम उपाय आहे.



# तजेलदार त्वचेसाठी आवश्यक आहे हे व्हिटॅमिन्स...

**ड्राय आणि सुरकुतलेल्या त्वचेसाठी आपला आहार जबाबदार आहे. पर्याप्त पोषण मिळाल्यावर आपलीही त्वचा तजेलदार होऊ शकते. तसे तर विभिन्न त्वचेसाठी वेगवेगळ्या आहाराची गरज असते परंतु निरोगी आणि तजेलदार त्वचेसाठी आपल्या आहारात हे व्हिटॅमिन्स असणे गरजेचे आहे. पाहू ग्लोइंग स्किनसाठी आवश्यक व्हिटॅमिन्स...**





**सर्वप्रथम** आपल्याला भरपूर पाणी प्यायला हवं. पाणी स्किनसाठी सर्वश्रेष्ठ औषधी आहे. पाणी आपल्या पूर्ण शरीराला रिफ्रेश करतं आणि आपल्या त्वचेला चमकदार करण्यात मदत करतं. ज्या प्रकारे शरीराला ऑक्सिजनची गरज आहे त्या प्रकारे स्किनसाठी व्हिटॅमिन्स आवश्यक आहे. पुढीलप्रमाणे व्हिटॅमिन्स आपल्या त्वचेला तजेलदार ठेवण्यात मदत करतील :

**व्हिटॅमिन सी :** हे रसदार फळांमध्ये आढळतं जसे संत्रं, लिंबू आणि मोसंबी

**व्हिटॅमिन ए :** याचे मुख्य स्त्रोत आहे- पपई, संत्रं, एग यॉर्क

**व्हिटॅमिन बी :** हे फळांसह सर्व पालेभाज्यांमध्ये आढळतं

**व्हिटॅमिन इ :** हे शेंगदाणे आणि इतर ऑइल सीड्समध्ये आढळतं.

# पायांच्या सुजण्यावर कोरफड एकच रामबाण उपाय



पायांना सूज येण्यामागे अनेक कारणे आहेत. अधिक काळ उभे राहणे, पायाला काही दुखापत होणे, पायामधून रक्त येणे इ. त्यामुळे पायांच्या दुखण्याच्या समस्या वाढतात. चालताना देखील अनेक त्रास होतो. अशा त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी लोक औषधांचा वापर करतात. औषधांच्या वापरामुळे योग्य फायदा होत नाही. त्यासाठी एक घरगुती उपाय नक्कीच करून पाहा. कोरफडच्या वापरामुळे ही समस्या कमी होण्याची शक्यता आहे. आपल्या रोजच्या जीवनात कोरफडचे अनेक फायदे आहेत.

**कोरफडमध्ये अनेक पोषक तत्त्वे असतात**

कोरफडमध्ये व्हिटॅमिन्स, एन्जाइम्स, सॅलिसिलिक ॲसिड, ॲण्टीऑक्सिडेंट, मिनरल्स, अमीनो ॲसिड हे पोषक तत्त्वे मोठ्या प्रमाणात आढळतात. कोरफडच्या पाण्यात काही वेळ पाय ठेवल्यास अत्यंत फायदा होतो.

**लागणारे साहित्य**

▮ कोमट पाणी कोरफडचा गर मॉइश्चराइजर

एका बादलीमध्ये कोमट पाणी घ्या, त्यामध्ये कोरफडचा गर एकजीव करून घ्या. आता या पाण्यात अर्ध्या तासासाठी पाय राहू द्या. काही वेळा नंतर पायांना मॉइश्चराइजर लावा.

# पोटाच्या कर्करोगासाठी हळद फार उपयुक्त

**आपल्या** दैनंदिन जीवनात हळदीचा वापर होत असतो. हळदीचा उपयोग फक्त स्वयंपाकासाठी नाही तर इतर कामांसाठी सुद्धा फायदेशीर ठरतो. हळद ज्याप्रमाणे जेवणाला चवदार बनवते त्याचप्रमाणे ती आरोग्यास अत्यंत लाभदायक आहे. फक्त किरकोळ आजारांसाठी हळद फायदेशीर नाही, तर गंभीर आजारावरसुद्धा हळद महत्त्वाची भूमिका बजावते. कक्यूर्मा लॉन्गा (हळदीचे झाड) यांच्या मुळांमधून निघणाऱ्या करक्युमिन पोटामध्ये होणाऱ्या कर्करोगास रोखण्यास मदत करतो.

फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ साओ पाउलो (युनिफासएसपी) आणि फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ पॅरा (यूएफओ)च्या संशोधकांनी ही माहिती ब्राझिलमध्ये प्रदान केली आहे. कर्क्यूमिन व्यतिरिक्त, हिस्टोन क्रियाकलाप सुधारित करण्यासाठी इतर यौगिकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यात कोल्काल्सी फेरॉल, रेव्हरेट्रॉलोल, क्वार्सेटिन, गार्सनॉल आणि सोडियम बटायट्रेट (आहारातील फायबरच्या निषेधा नंतर आतड्यातील बॅक्टेरियाद्वारे उत्पादित) यांचा समावेश असतो. ग्लोबल कॅन्सर रिसर्च इंटरनॅशनलच्या पोटाच्या कर्करोगाच्या आकडेवारीनुसार, जागतिक पातळीवर प्रत्येक वर्षी एकूण ९ लाख ५२ हजार गॅस्ट्रिक कर्करोग्रस्त रुग्ण आढळले आहेत. ज्यामध्ये अंदाजे ७ लाख २३ हजार रुग्ण कर्करोगाने बळी पडतात. म्हणजे एकूण ७२ टक्के रुग्ण या गंभीर आजाराचे शिकार होतात.



भारत देशात पोटाचा कर्करोग झाल्याची रुग्णांची संख्या सुमारे ६२ हजार एवढी आहे. त्यामध्ये ८० टक्के रुग्ण प्रत्येक वर्षी मृत्युमुखी पडतात. याबाबतीत हेल्थ केअर फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.के. के.अग्रवाल यांनी आपले मत व्यक्त केले आहे. 'पोटाचा कर्करोग हळूहळू विकसित होतो. त्यामुळे सुरुवातीला कोणतीही लक्षणे समोर येत नाहीत.' पोटाच्या कर्करोगाच्या सामान्य लक्षणांमध्ये भूक कमी लागणे, वजन कमी होणे, पोटात दुखणे, अपचन होणे, उल्टी होणे (रक्ताची उल्टी होण्याची शक्यता), पोटाला सुज येणे इ. यापैकी काही लक्षणांवर रुग्ण तत्काळ उपचार घेतो. कारण हे लक्षणे दिसण्यात येतात. परंतु उपचारानंतरही हे आजार कायम राहतात.

कर्करोगाच्या उच्च दराचे प्रमुख कारण म्हणजे, यांत्रिक युगात तणावाचे प्रमाण वाढले आहे. धूम्रपान करणे आजाराचे प्रमुख कारण आहे. पोटाच्या कर्करोगासाठी योग्य वेळी योग्य उपचार घेते महत्त्वाचे आहे. डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. पहिल्या काही वर्षांमध्ये ३ ते ६ महिने सतत डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते, असे वक्तव्य डॉ. के.के. अग्रवाल यांनी व्यक्त केले आहे.

# जांभूळ खा आणि तंदुरुस्त राहा

▮ जांभळामध्ये असलेल्या मधुमेहविरोधी गुणधर्मामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. जांभळामुळे रक्तातील स्टार्च आणि साखरेचं रूपांतर ऊर्जेमध्ये होतं.

▮ जांभळाच्या फळासोबतच जांभळाच्या बियांची पावडर, जांभळाच्या झाडाची साले, जांभळाचा रस याचाही मधुमेहाच्या उपचारात चांगला उपयोग होतो.

▮ जांभळाच्या झाडाच्या सालाची आणि बियांची पावडर पोटाच्या विकारावर गुणकारी असते. डायरिया, अपचन, जुलाब यासारख्या आजारात ती फायदेशीर ठरते.

▮ जांभूळ नैसर्गिकरीत्या रक्त शुद्ध करते. जांभळामध्ये मोठ्या प्रमाणावर लोह म्हणजेच आर्यन असतं. त्यामुळे जांभूळ खाल्ल्यानेही रक्तातील हिमोग्लोबीन वाढतं.

▮ जांभळात मोठ्या प्रमाणात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्वं असतं. तसेच खनिजंही असतात त्याचा उपयोग डोळ्यांचं आणि त्वचेचं आरोग्य सुदृढ ठेवण्यास होतो. रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.

▮ जांभूळ थंड फळ असल्यानं पोटातील आग आणि अपचन यावर उपयोगी असतं.

▮ जांभूळ खाल्ल्यानं दात आणि हिरड्या मजबूत होतात. तसेच दात आणि हिरड्यात संसर्ग होत नाही.

▮ जांभळाच्या बियांची पावडर गायीच्या दुधात मिक्स करून हा लेप चेहऱ्याला लावल्यास चेहऱ्यावरच्या मुरुम, पुटकुळ्या निघून जातात.

▮ ज्यांना भूक लागण्याची समस्या आहे त्यांनी जांभळाचं व्हिनेगर/सिरप दिवसातून दोन ते तीन वेळेस पाण्यासोबत समप्रमाणात घेतल्यास भूक वाढते.

▮ जांभळाच्या ज्यूसचा उपयोग अशक्तपणा, ॲनेमिया यावरही होतो. तसेच जांभळाच्या ज्यूसच्या नियमित सेवनानं स्मरणशक्ती वाढते.



# लिव्हर (यकृत)साठी घरगुती उपाय गुणकारी

**स्मोकिंग, अल्कोहोल, तणाव व जंकफूड या गोष्टीमुळे लिव्हरवर ताण पडतो. यामुळे अनेकांना लिव्हरच्या संदर्भातील आजार उद्भवतात. त्यापासून मुक्तता मिळवायची असेल तर जेवणात नियमित हळदीचा वापर करावा. रात्रीच्या वेळी झोपताना चिमूटभर हळद दुधामध्ये टाकून दूध प्यावे. त्यामुळे तुमचे लिव्हर चांगले राहते व तुम्हाला कफ, खोकला या रोगांपासून मुक्तता मिळेल.**



▮ आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते तसेच पोटासाठी आवळा फायदेशीर आहे. कारण या आवळ्यामध्ये लिव्हरचे रक्षण करण्याचे गुण असतात.

▮ जे लोक अल्कोहोलिक फॅटी लिव्हर रोगामुळे त्रस्त आहेत. त्यांच्या लिव्हरमध्ये ट्रान्सएमानेज एन्झाइम्सचे प्रमाण वाढते. ज्येष्ठमधातील तत्त्व या एन्झाइमचे प्रमाण लिव्हरमधून कमी करण्यात सक्षम आहेत. त्यामुळे ज्येष्ठमध लिव्हरसाठी लाभकारी ठरते.

▮ जुने लोक आपल्या तुळशीच्या रोपांसोबत गुळवेलीचेही रोप लावत, कारण गुळवेल ही तुळशीप्रमाणे आपले शरीर निरोगी ठेवण्यास मदत करते. म्हणून जुने लोक गुळवेलीची ४-५ पाने दररोज चावून चावून खात.

▮ जवसाच्या बियांमध्ये साइटोकोंन्स-टीट्यूएंट्स आढळून येते. त्यामुळे हार्मोन्सला एकत्रित होण्यापासून रोखले जाते. यामुळे लिव्हरवर कमी दाब पडतो.

▮ बीट, कोबी, गाजर, ब्रोकली, कांदा, लसूण, आदी भाज्या लिव्हरसाठी फायदेशीर असतात.

# मूर्तिकारांना शेकडो टन मोफत शाडूचे वाटप अन् विनामूल्य जागा

■बातमी/लेख, प्रीती दिपक नाईक : यंदा मुंबई महापालिकेने तब्बल ९१० टन शाडू मातीचे वाटप गणेश मूर्तिकारांना केले आहे. गेल्या वर्षी ५०० टन शाडू माती मोफत दिली होती. यंदा त्याहून ४१० टन शाडू जास्त दिली आहे. महापालिकेने प्रत्येक परिमंडळात १०० टनाहून अधिक शाडू मातीचा पुरवठा केला आहे. त्याचवेळी महापालिका ९९३ मूर्तिकारांना मंडप उभारण्यासाठी विनामूल्य जागा देऊ केली आहे. यंदा शाडू मातीचा पुरवठा वाढल्याने गणेशमूर्तींच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.



**मंडपासाठी विनामूल्य जागा**
मुंबई महापालिका पर्यावरणपूरक मूर्ती घडवणाऱ्या मूर्तिकारांसाठी विनामूल्य जागा उपलब्ध करून देणार आहे. त्यासाठी प्रथम येणाऱ्या अर्जदाराला प्राधान्य दिले जाणार आहे. एकूण ९९३ मूर्तिकारांना मंडपासाठी जागा देण्यात येणार आहे. त्यांना मूर्ती घडवण्यासाठी तात्पुरती जागाही मोफत देण्यात आली आहे. विनामूल्य मंडपांमध्ये आर/दक्षिण विभागातून १३९, के/पश्चिम विभागात ९० मूर्तिकारांना तसेच पी/उत्तर विभागात ७४ आणि पी/दक्षिण विभागात ७२ मूर्तिकारांना मंडपासाठी परवानगी देण्यात आली आहे.

मुंबईत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्यासाठी शाडू माती पुरवण्यात आली आहे. तसेच ज्या मूर्तिकारांना आणखी शाडू माती हवी असेल, त्यांनी महापालिकेच्या संकेतस्थळावर (www.mcgm.gov.in) 'नागरिकांकरीता' या रकान्यामध्ये 'अर्ज करा' या रकान्यात 'मंडप (सार्वजनिक गणेशोत्सव/नवरात्रौत्सव/इतर उत्सव)' या सदरामध्ये मागणी नोंदवावी, असे आवाहन परिमंडळ २ चे उपायुक्त आणि श्रीगणेशोत्सवाचे समन्वयक प्रशांत सपकाळे यांनी केले आहे. यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्यासाठी महापालिकेने नियोजनासह कृती सुरू केली आहे. महापालिका प्रशासनाकडून विविधा सेवा-सुविधा पुरवल्या जात आहेत. यंदा २५ जुलैपर्यंत ९१० टन २३५ किलो शाडू मातीचे मोफत वाटप करण्यात आले असून के/पूर्व विभागात सर्वाधिक ९६ टन ६१५ किलो शाडू वाटप करण्यात आले आहे. त्याखालोखाल जी/उत्तर विभागात ९१ टन २० किलो, पी/उत्तर विभागात ८२ टन ४५५ किलो, डी विभागात ७४ टन २०० किलो; तर एफ/दक्षिण विभागात ७२ टन ६०० किलो शाडू मातीचे वाटप करण्यात आले आहे.

# ठाणे महापालिका क्षेत्रातील १५१ अनधिकृत बांधकामांवर कारवाई

■ठाणे : उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश आणि प्रभाग समितीच्या बीट निरिक्षकांनी केलेल्या पाहणीत आढळलेल्या १५१ अनधिकृत बांधकामांवर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने आतापर्यंत कारवाई केली आहे. १९ जूनपासून नियमितपणे ही कारवाई सुरू असून त्यात शीळ येथील एम के कम्पाऊंडमधील २१ इमारतींच्या पाडकमांचाही समावेश आहे. या १५१ अनधिकृत बांधकामांपैकी ११७ बांधकामे पूर्णपणे निष्कासित करण्यात आली आहेत. तर, ३४ बांधकामांमधील अनधिकृत वाढीव बांधकाम हटवण्यात आले आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात, १९ जूनपासून नियमितपणे अतिक्रमण विरोधी पथकाची कारवाई सुरू आहे. त्यासाठी नऊ प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्त्वात विशेष पथकांची महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नियुक्ती केली आहे. प्रभाग समिती क्षेत्रात बीट निरीक्षकांनी नोंदलेली आणि सध्या सुरू असलेली अनधिकृत बांधकामे पाडण्यास या मोहिमेत प्राधान्य आहे. आतापर्यंत तोडण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांमध्ये ११७ बांधकामे पूर्णपणे पाडली आहेत. तर, ३४ या बांधकामांमधील अनधिकृत वाढीव बांधकामे हटवण्यात आल्याची माहिती उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे यांनी दिली.

महापालिका क्षेत्रात अनधिकृत चाळी, अनधिकृत बैठी बांधकामे, वाढीव शेड, वाढीव बांधकाम, प्लिंथचे बांधकाम, अनधिकृत टर्फ या प्रकारच्या बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई नियमितपणे सुरू राहणार असल्याची माहितीही उपायुक्त पाटोळे यांनी दिली. या मोहिमेची अमलबजावणी आणि प्रत्यक्ष कारवाई यांचा दैनंदिन स्वरुपातील आढावा अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे घेत आहेत. अतिक्रमण विरोधी कारवाईमध्ये उपायुक्त (परिमंडळ), सर्व सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता, अतिक्रमण आणि बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. या कारवाईसाठी पोकलेन, जेसीबी, गॅस कटर, ट्रॅक्टर ब्रेकर, मनुष्यबळ यांचा वापर करण्यात येत आहे. पोलीस आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांच्या बंदोबस्तात ही कारवाई करण्यात येत आहे.





**कारवाईच्या आकडेवारीचा तक्ता :**
**(१९ जून ते २४ जुलैपर्यंतची आकडेवारी)**
- नौपाडा-कोपरी - १०
- दिवा - ४०
- मुंब्रा - २०
- कळवा - १७
- उथळसर - १०
- माजिवडा-मानपाडा - २६
- वर्तक नगर - ११
- लोकमान्य नगर - १३
- वागळे इस्टेट - ०४
- **एकूण - १५१**

# रस्ते कॉँक्रीटीकरणाला १ ऑक्टोबरपासून पुन्हा सुरुवात...
## १५ ऑगस्टला रस्ते कामांची यादी पालिकेच्या वेबसाइटवर प्रसिद्ध होणार


■मुंबई : मुंबईतील रस्ते कॉँक्रीटीकरणाच्या कामांना १ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. या कामांबाबत पालिकेतर्फे नागरिकांना आधीच माहिती दिली जाणार आहे. १५ ऑगस्टला रस्ते कामांची यादी पालिकेच्या वेबसाइटवर प्रसिद्ध होणार आहे. ज्या रस्त्यांची कामे अर्धवट झालेली आहेत ती कामे सर्वात आधी केली जातील. त्यानंतर अन्य रस्त्यांच्या कामांना सुरुवात केली जाणार आहे. २०२७ च्या अखेरपर्यंत रस्ते कॉँक्रीटीकरणाची कामे पूर्ण केली जाणार आहेत, असे पालिकेच्याच्या रस्ते व ट्रॅफिक विभागाचे मुख्य अभियंता गिरीश निकम यांनी सांगितले. पालिकेतर्फे मुंबईतील रस्त्यांच्या कॉँक्रीटीकरणाची कामे ३१ मे रोजी थांबवण्यात आली होती. आता पावसाळा संपल्यानंतर पुन्हा ही कामे सुरू केली जाणार आहेत. एकूण ४९ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. हा प्रकल्प जुलै २०२२ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार सुरू करण्यात आला होता. शहरातील रस्ते खड्डेमुक्त करणे हा उद्देश या प्रकल्पाचा आहे. मुंबईतील एकूण २,१२१ रस्त्यांवर काम करण्याचे नियोजन आहे. या रस्त्यांची एकूण लांबी ६९८.४४ किलोमीटर आहे. ३१ मे पर्यंत, १,३८५ रस्त्यांच्या कॉँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. त्याची लांबी ३४२.७४ किलोमीटर आहे. तर ६१४ रस्त्यांचे (१५६.७४ किलोमीटर) काम अर्धवट झाले आहे. १ ऑक्टोबरपासून या ६१४ रस्त्यांवर काम पुन्हा सुरू होईल. उर्वरित ७३६ रस्त्यांचे काम नंतर केले जाईल.

**नोंदवलेल्या तक्रारींची स्थिती कळवा**
बुधवार एका बैठकीत, पालिका आयुक्त भूषण गागराणी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ तोडगा काढण्याचे निर्देश दिले तसेच नागरिकांना त्यांच्या नोंदवलेल्या तक्रारींची स्थिती कळवा, आधीच्या चांगल्या स्थितीत असलेल्या रस्त्याच्या कडेला असलेले पदपथ तोडू नका, असे निर्देश दिले.



# अटल सेतूवर मिळणार हायटेक इंटरनेट... पुलाच्या आतून ऑप्टीकल फायबरचे जाळे

■उरण : अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूच्या पोटात ऑप्टिकल फायबरचे जाळे बसविले जाणार आहे. गर्डरने तयार झालेल्या या सेतूच्या मुख्य रस्त्याच्या खालील भागातील पोकळीत या वाहिन्या असतील. सागरी किंवा कुठल्याही सेतूवर अशाप्रकारचे ऑप्टिकल फायबर जाळे बसविण्याचा हा देशातील पहिलाच प्रयोग आहे. २१.८० किमी लांबी व त्यापैकी १८.१८ किमी लांबी समुद्रावरून असलेला 'अटल सेतू' हा देशातील सर्वाधिक लांबीचा सागरी पूल आहे. हा पूल विविध गर्डर एकमेकांना जुळवून उभा झाला आहे. हे गर्डरही विविध प्रकारचे आहेत. त्यातील काही गर्डर पोलादी आहेत, तर काही गर्डर सिमेंट कॉँक्रीटचे आहेत.



सिमेंट कॉँक्रीटचे गर्डर 'बॉक्स' पद्धतीचे असल्याने आतून पोकळ आहेत. सेतूवरील पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्या, विद्युत दिव्यांसाठीच्या वाहिन्या व अन्य सामग्री या पोकळीतच बसविण्यात आली आहे. याच पोकळीत आता ऑप्टिकल फायबरचे जाळेदेखील बसविले जाणार आहे. त्यासाठी हा सेतू उभा केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) निविदा काढली आहे. निविदेंतर्गत संबंधित कंत्राटदाराला अटल सेतूच्या पोटात (गर्डरच्या पोकळीत) ५० मिमी जाडीच्या दोन ऑप्टिकल फायबर वाहिन्या बसवायच्या कंत्राटदाराला त्या जागेचा परवाना प्राप्त होईल. याआधारे अटल सेतूवरील वाहनचालकांना इंटरनेटची सुविधा देता येणार आहे. वाहनचालकांकडून वापरल्या जाणाऱ्या इंटरनेटच्या माध्यमातून कंत्राटदाराला महसूल मिळेल. तर, 'एमएमआरडीए' या मोबदल्यात कंत्राटदाराकडून भाडे आकारणार आहे. पाच वर्षांसाठी हा करार असेल. तसेच, यासंबंधीच्या करारानंतर ६० दिवसांत हे जाळे कंत्राटदाराला बसविणे अत्यावश्यक असेल.

**एमएमआरडीए करणार देखभाल**
या कंत्राटाच्या माध्यमातून मिळणारा महसूल 'अटल सेतू'च्या उभारणीपोटी आलेल्या भांडवली खचार्चा परतावा किंवा सेतूच्या दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी 'एमएमआरडीए' कडून वापरला जाणार आहे. या उपक्रमातून मिळणारा महसूल ह्यअटल सेतूह्णच्या उभारणीपोटी आलेल्या भांडवली खचार्चा परतावा देण्यासाठी किंवा सेतूच्या दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी ह्यएमएमआरडीएह्णकडून वापरण्यात येणार आहे. त्याचबरोबर, अशा प्रकारे तांत्रिक सुविधांचा वापर करून महसूल मिळवण्याचे हे मॉडेल इतर पायाभूत प्रकल्पांसाठीही दिशादर्शक ठरेल, तसेच ह्यस्मार्ट सिटीह्ण आणि ह्यडिजिटल इंडियाह्ण यांसारख्या व्यापक धोरणांना चालना देणारे ठरेल.

# कर्तव्य बजावताना पोलिसाचा अपघाती मृत्यू



■नवी मुंबई : महापे उड्डाणपुलाखाली वाहतूक नियमन करत असताना क्रेनखाली येऊन महापे वाहतूक शाखेतील पोलीस हवालदार गणेश पाटील यांचा मृत्यू झाला. ही दुर्घटना गुरुवारी दुपारी सव्वाबाराच्या सुमारास घडली. गणेश पाटील हे वाहतूक नियंत्रणासाठी महापे वाहतूक शाखेसमोरील चौकात उभे असताना, रबाळे एमआयडीसीहून तुर्भेच्या दिशेने जाणाऱ्या क्रेनने निष्काळजीपणे धडक दिली. धडकेनंतर पाटील क्रेनच्या चाकाखाली सापडले आणि गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ वाशीतील महापालिकेच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती डॉक्टरांनी दिली. अपघातानंतर महापे वाहतूक पोलिसांनी क्रेनचालक राजेश गौंड याला तातडीने ताब्यात घेतले. तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर पोलीस दलात तीव्र संताप व दुःख व्यक्त होत आहे. ड्युटीवर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलीस संघटनांकडून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी योग्य ती सुरक्षा व्यवस्था आणि नियमांचे काटेकोर पालन करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# चिमुकलीवर बलात्कार करून हत्या... आरोपीची फाशीची शिक्षा केली रद्द

■मुंबई : अडीच वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या कामगाराला दोषी ठरवून फाशीची शिक्षा ठोठावणारा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय उच्च न्यायालयाने बुधवारी रद्द केला. पुणे जिल्ह्यात फेब्रुवारी २०२१ मध्ये ही धक्कादायक घटना घडली होती. जलदगती कनिष्ठ न्यायालयाने या प्रकरणातील अतिरिक्त पुराव्यांच्या आधारे नव्याने युक्तीवाद ऐकून घ्यावेत, असे निर्देश देत उच्च न्यायालयाने आरोपीची फाशीची शिक्षा रद्द केली. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि श्याम चांडक यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

फेब्रुवारी २०२२ मध्ये कनिष्ठ न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून फाशी सुनावली होती. त्या शिक्षेला आरोपीने आव्हान दिले. त्याचबरोबर उच्च न्यायालयाने फाशीच्या शिक्षेवर शिक्कोमोर्तब करून घेण्यासाठी याचिका दाखल केली. दोन्ही याचिकांवर न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने कनिष्ठ न्यायालयाच्या निकालावर प्रश्नचिन्हे उपस्थित करीत आरोपीची फाशीची शिक्षा रद्द केली. तसेच कनिष्ठ जलदगती न्यायालयाने अतिरिक्त पुराव्यांच्या आधारे युक्तिवाद पुन्हा ऐकावेत तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशाने प्रभावित न होता कायद्याला धरून खटल्याबाबत नव्याने निर्णय द्यावा, असे खंडपीठाने शिक्षेचा निर्णय रद्द करताना नमूद केले. हा फाशीचा खटला असल्याने आरोपीला स्वतःचा बचाव करण्यासाठी सर्व संधी मिळाल्या पाहिजेत. खटला सुरू असलेल्या न्यायालयासमोरच अतिरिक्त पुराव्यांबाबत सर्व पैलूंवर युक्तिवाद करण्याची संधी आरोपीला मिळाली पाहिजे, असेही खंडपीठाने म्हटले आहे.

# पोलीस उपनिरीक्षकाला ५० हजारांची लाच घेताना अटक

■पनवेल : पनवेल शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक सचिन वायकरला ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना सोमवारी रात्री साडेदहाच्या सुमारास अटक करण्यात आली आहे. ही कारवाई रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल येथे केली.



तक्रारदाराच्या वडिलांविरोधात जमिनीच्या सातबारा नोंदीशी संबंधित गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात गंभीर कलमे वाढवून अटक होईल, अशी भीती दाखवून उपनिरीक्षक वायकरने सुरुवातीला १ लाख रुपयांची लाच मागितली, मात्र तडजोडीनंतर ५० हजार रुपये स्वीकारण्याचे ठरले.

संबंधित गुन्हा दाखल झाल्यावर उपनिरीक्षक वायकर याने तपासादरम्यान संशयीत आरोपींकडून वेळोवेळी लाखो रुपये उकळले होते. या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या तक्रारदाराने रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानंतर उपअधीक्षक सरिता भोसले आणि पोलीस निरीक्षक निशांत धनवडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सापळा रचून कारवाई केली. सोमवारी रात्री १०.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये उपनिरीक्षक वायकर यांनी आपल्या खासगी मोटारीतून खासगी व्यक्ती रविंद्र उर्फ सचिन सुभाष बुट्टे (रा. करंजाडे) याच्या माध्यमातून ही रक्कम स्वीकारली. लगेचच त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले.

# भाईंदरमध्ये ७४ वर्षांच्या व्यक्तीची डिजीटल अरेस्ट, ९५ लाखांची फसवणूक

■भाईंदर : लखनऊ, उत्तरप्रदेश येथे एका ७४ वर्षांच्या वृध्द व्यक्तीची दोन भावांनी मिळून डिजीटल अरेस्ट करुन ९५ लाखांची फसवणूक केली होती. त्या आरोपींना मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण कक्ष, मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयाने सायबर पोलीस लखनऊ यांच्या मदतीने मिरा-भाईंदर येथून अटक केली आहे. उत्तरप्रदेश राज्यातील लखनऊ येथील फियार्दी बी. एन. सिंह ( ७४ ) यांना डिजीटल अरेस्ट करुन त्यांच्या वृधापकाळाचा फायदा घेवून त्यांच्याकडून तब्बल ९५ लाख रुपये खंडणी उकळून त्यांची फसवणूक करण्यात आली आहे. याबाबत लखनऊ, उत्तरप्रदेश सायबर सायबर क्राईम पोलीस ठाण्यात ८ एप्रिल २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





यांच्या गुन्ह्यातील आरोपी मोहम्मद इकबाल बालासाहेब पुत्र इकबाल चिन्नु बालासाहेब आणि शाईन इकबाल बालासाहेब पुत्र इकबाल चिन्नु बालासाहेब या दोघा भावांनी या गुन्हयातील वयोवृध्द फियार्दीची फसवणूक केली आहे.

यांप्रकरणी तपासकामी या गुन्हयाचे तपास अंमलदार सुनील कुमार सिंह (पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे, लखनऊ, उत्तर प्रदेश) हे त्यांच्या पथकासह मिरा रोड येथे आले. त्यांनी गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त संदिप डोईफोडे यांना पोलीस मदत मिळण्यासाठी विनंती केली. पोलीस उप-आयुक्तांनी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे यांना योग्य ती मदत करण्याबाबत आदेश दिले. त्याप्रमाणे पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी दोन्ही आरोपी मोहम्मद इकबाल बालासाहेब पुत्र इकवाल चिन्नु बालासाहेब व शाईन इकबाल बालासाहेब पुत्र इकबाल चिन्नु बालासाहेब, यांना मिरारोड येथून २४ जुलै रोजी ताब्यात घेवून सायबर पोलीस लखनऊ, उत्तर प्रदेश यांच्या ताब्यात दिले आहे. पुढील कारवाई सायबर पोलीस लखनऊ हे करत आहेत.

# नालासोपारा पती हत्या प्रकरण, पुण्यात लपलेले आरोपी असे सापडले...

■विरार : नालासोपारा पूर्वेतील धानिव बाग हत्याकांडातील आरोपी महिलेच्या तोंडावरून उडालेल्या ओढणीमुळे आरोपींचा शोध लागला आहे.नालासोपारा पूर्वेतील धानिव बागमधील खळबळजनक हत्याकांडातील आरोपींचा तपास करण्यासाठी पेल्हार पोलीस पुण्यात दाखल झाले होते. तपासाच्या दरम्यान, पुण्यातील हडपसर येथील एका औषध दुकानाजवळ बसलेल्या महिलेच्या तोंडावरून हवेच्या झोक्यामुळे उडालेली ओढणी पोलिसांच्या लक्षात आली. त्या क्षणी पोलिसांनी संशयितांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवले आणि मिळालेल्या माहितीच्या आधारे पुढील कारवाई करत अवघ्या २४ तासांत आरोपींना पुण्याच्या हडपसर येथून अटक केली. या यशस्वी कारवाईमुळे खुनाचा उलगडा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पोलिसांनी आरोपींना न्यायालयात हजर करून सात दिवसांची पोलीस कोठडी मिळवली असून, या प्रकरणातील पुढील तपास वेगाने सुरू होणार आहे. आरोपी पुण्याच्या हडपसर येथे फिरत होते. नालासोर्पायात एका महिलेने प्रियकराच्या मदतीने आपल्या पतीची हत्या केल्याचे धक्कादायक प्रकरण समोर होते. त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी मृतदेह घरातच गाडून त्यावर टाईल्स बसवल्या होत्या. सोमवारी पेल्हार पोलिसांनी तहसिलदारांच्या उपस्थितीमध्ये टाईल्स खणून मृतदेह बाहेर काढला होता. त्याअगोदर पत्नी आणि प्रियकर घरातून फरार झाले होते.



नालासोपारा पूर्वेतील धानिव बाग येथील राशिद कंपाऊंड, ओम साई वेल्फेअर सोसायटीत विजय चौहान (३२) हा आपली पत्नी चमन देवी चौहान (२८) तीन वर्षांच्या मुलीसोबत राहत होता. तो मजुरीचे काम करत होता. मागील १५ दिवसांपासून विजय चौहान अचानक बेपत्ता झाला होता. विजयचे दोन भाऊ बिलालपाडा येथे राहतात. त्यांनी विजयची शोधाशोध सुरू केली होती. पण काहीच माहिती मिळाली नव्हती. विजय कामानिमित्ताने बाहेर गेला आहे, असे त्याची पत्नी चमन देवी त्यांना वारंवार सांगत होती.

विजय चौहान बेपत्ता असताना दोन दिवसांपूर्वी त्याची पत्नी चमन देवी ही शेजारी राहर्णाया मोनू शर्मा (२०) याच्यासोबत पळून गेली. चमन देवी आणि मोनू शर्मा यांच्यात मागील काही महिन्यांपासून प्रेमसंबंध असल्याचे स्थानिकांनी सांगितले. दरम्यान, सोमवारी सकाळी विजय चौहानचे दोघे भाऊ त्याच्या घरी गेले असता त्यांना जमिनीवरील काही टाईल्स नव्याने बसवलेले दिसले. संशय आल्याने त्यांनी त्या उकरून पाहिल्या असता आतून एक बनियान आढळला आणि दुर्गंधी येऊ लागली. यामुळे त्यांना हत्या करून मृतदेह जमिनीत गाडल्याचा संशय आला आणि त्यांनी तात्काळ पेल्हार पोलिसांना बोलावले. पोलिसांनी तपास सुरू केला आणि मृतदेह बाहेर काढण्यासाठी तहसीलदारांची मदत मागितली. मात्र तहसीलदार पालघर येथे एका कार्यक्रमात उपस्थित असल्याने ते संध्याकाळी ५ वाजता घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर पोलिसांनी उत्खनन करून सुमारे ६ वाजता मृतदेह बाहेर काढला आणि शवविच्छेदनासाठी मुंबईच्या जेजे रुग्णालयात तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे.

**आरोपी तरुण उच्च शिक्षित**
आरोपी मोनू शर्मा हा उच्चशिक्षित असून तो त्याच ठिकाणच्या बाजूच्या रूममध्ये राहण्यासाठी होता. त्यामुळे त्यांची ओळख देखील त्याच ठिकाणी झाली होती. मृतक विजय चौहान यांच्या खात्यावर लाखोची रक्कम आली होती. ही रक्कम विमा पॉलिसीतून आली असल्याची माहिती समोर आली आहे.

# पोलीस असल्याचे सांगून अपहरण
## ५० लाखांची खंडणी मागणारे दोघे गजाआड

■भाईंदर : काशिमीरा परिसरातील हॉटेलमधून एका गुजरातमधील व्यापाऱ्याचे अपहरण करून त्याच्याकडून ५० लाखांची खंडणी मागणाऱ्या टोळीवर काशीमीरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी राहुल चौधरी व विशाल चौधरी या दोघांना अटक करण्यात आली आहे. गुजरातमधील सुरतचे रहिवासी रोहित तेलपुरीया हे भाईंदरच्या सोना लॉजिंगमध्ये थांबले असताना त्यांचा ओळखीचा विशाल चौधरी पाच अनोळखी व्यक्तींना घेऊन त्यांच्या खोलीत आला. ह्यआम्ही पोलीस आहोतह्ण असे सांगून त्यांनी रोहित यांचे अपहरण केले. नंतर डोळ्याला पट्टी बांधून हायवेवर नेले गेले आणि त्यांच्या पत्नीशी फोनवर संपर्क करून ५० लाखांची खंडणी मागण्यात आली. पत्नीने जवळचे दागिने दिले तर रोहित यांच्याकडील १.२ लाख रुपये रोख व १८ हजारांचे घड्याळ काढून घेतले गेले. या प्रकरणी १२ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com